


रायगड, शनिवार, दि. १८ मे २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

**अलिबाग-नागाव रोडटच आमराई विकणे आहे**

१५.५ गुंठे, क्लियर टायटल, फ्रेश, हमरस्त्याला लागून सिटी सर्वे, संपूर्ण तार कंपाऊंड गेट, २४ X ७ सीसीटीव्ही कॅमेरा निरीक्षण, प्रिमियम लोकेशन, एस.टी. स्टॉपला लागून, नळ, इलेक्ट्रीसिटी पोल जवळच, Direct Party, एजंट सुद्धा चालेल.

संपर्क - ९७६९१०८१७०

**आजचा अग्रलेख**
**बे-कायद्याचे राज्य**

## वे|ध|क

### जरांगे यांची प्रकृती बिघडली

**छत्रपती संभाजीनगर:** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची प्रकृती बिघडली आहे. अशक्तपणा जाणवत असल्यामुळे छत्रपती संभाजीनगरच्या गॅलक्सी रुग्णालयात ते उपचारासाठी दाखल झाले आहेत. महाराष्ट्र दौऱ्यावर असताना प्रकृती खालावल्याने त्यांना दौरा अर्धवट सोडावा लागला. डॉक्टरकडून जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची तपासणी करण्यात आली. अशक्तपणा जाणवत असल्याने जरांगे पाटील रुग्णालयात दाखल झाले.

### गुटखा जप्त

**पनवेल :** कळंबोली स्टील मार्केट येथून चार लाख ८१ हजार रुपयांचा गुटखा पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी मनोरंजन मृत्युंजय बारीक याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांना स्टील मार्केट कळंबोली येथील गोडाऊन मध्ये शासनाने प्रतिबंधित केलेला पान मसाला व सुगंधी तंबाखूचा विक्रीसाठी साठा करून विक्री करता ठेवला असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने त्या ठिकाणी छापा टाकला.

### २४ लाख १६ हजारांची फसवणूक

**पनवेल :** वेगवेगळे टास्क देऊन ते टास्क पूर्ण केल्यास प्रॉफिट मिळणार असे सांगून तब्बल २४ लाख १६ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. महिलेला टास्क देऊन तिच्या खात्यावर पैसे जमा केले. असे करता करता त्यांच्याकडून २४ लाख १६ हजार ७०५ रुपये घेतले. ११ मार्च ते ६ एप्रिल पर्यंत मोबाईल वरून बोलणाऱ्या इसमाने त्यांना वेगवेगळे टास्क दिले आणि टास्क करण्याचे सांगून टास्क पूर्ण केल्यास प्रॉफिट मिळणार असे सांगितले आणि २४ लाख १६ हजार ७०५ रुपयांची फसवणूक केली.

## फलोदी सट्टा बाजार

# ‘इंडिया’ला ‘सत्ता’

### समाज माध्यमांवर डेटा लिक झाल्याने देशभर खळबळ

**आविष्कार देसाई**
**। रायगड ।**

**लोकसभेच्या चौथ्या टप्प्यातील देखील मतदान आता पार पडले आहे. कोणत्या राजकीय पक्षाला किती जागा मिळणार आणि कोणाची सत्ता येणार याबाबत सर्वत्रच चर्चा रंगत आहेत. अदृश्य असणाऱ्या फलोदी सट्टाबाजाराने वर्तवलेल्या अंदाजाने देशभरात खळबळ माजली आहे. समाजमाध्यमांवर उघड (लिक) झालेल्या या अहवालाने चांगलाच धुमाकूळ घातला आहे. त्यांनी केलेल्या आकलनानुसार देशातून मोदी सरकार पाय उतार होत असून इंडिया आघाडी बहुमताच्या जवळ जात असल्याचे म्हटले आहे. इंडिया आघाडीला सुमारे ३४३, तर भाजपाला सुमारे १७० जागा मिळतील असे म्हटले आहे.**

या सट्टाबाजारात आतापर्यंत १०० कोटीहून अधिकचा सट्टा लागला आहे. ४ जूनपर्यंत तो ४०० कोटींवर पोचणार असल्याचे बोलले जाते. देशभरात पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मतदानाचा आकडा फारच खाली घसरला होता. त्यामुळे देशात मोदीविरोधी वातावरण असल्याचे बोलले गेले. तिसऱ्या आणि चौथ्या टप्प्यातील मतदान पार पडल्यावर हा आकडा वाढला असला तरी, त्याचा फायदा भाजपाला होताना दिसत नाही. उलट इंडिया आघाडीला विजयाची संधी असल्याचा निष्कर्ष फलोदी सट्टाबाजाराने काढला आहे. बाकी असलेल्या शेवटच्या तीनही टप्प्यात इंडिया आघाडीचे वर्चस्व राहणार असल्याचे म्हटले आहे.

सध्या देशातील हवेने दिशा बदलली असल्याचा अंदाज सट्टेबाजांनी वर्तवला आहे. नुकतेच राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनीही राजस्थानमध्ये काँग्रेस चांगली कामगिरी करेल, असे विधान केले होते. गेहलोत म्हणाले होते की, राज्यात काँग्रेस दुहेरी आकडी जागा जिंकेल. त्याचप्रमाणे इंडिया आघाडीच्या सर्वच नेत्यांनी देशात सत्तांतर होणार असल्याचे म्हटले होते. सदरच्या आकडेवारीमध्ये काही मतदार संघाचा अंदाज सट्टेबाजांनी दिलेला नाही.

### फलोदी सट्टेबाजीचा इतिहास

**राजस्थानमध्ये फलोदी जिल्हा आहे. तेथील सट्टेबाजी बाजार सुमारे ५०० वर्षे जुना असल्याची माहिती समोर आली आहे. सुरुवातीच्या काळात येथे बैलांच्या लढतीवरही सट्टा खेळाला जायचा. पुढे निवडणुकीच्या निकालाचा अचूक अंदाज बांधण्यात आणि वादळ-पावसावर सट्टा लावण्यातही हा बाजार माहीर झाला. असे म्हटले जाते की १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत फलोदी सट्टेबाजारात स्थानिक लोकांनी विजय किंवा पराभवावर पैज लावली होती. तेव्हापासून आजपर्यंत प्रत्येक निवडणुकीत कोट्यवधींचा सट्टा खेळला जात आहे. हा बाजार आपल्या सांस्कृतिक वारशाचा एक भाग असल्याचे तेथील स्थानिकांचे म्हणणे असल्याचे बोलले जाते.**




| राज्य | इंडिया | भाजपा |
|---|---|---|
| राजस्थान | १२ | १३ |
| पंजाब | १३ | ०० |
| हरियाणा | ०८ | ०२ |
| ओरीसा | ०५ | ०९(अन्य ७) |
| महाराष्ट्र | ३० | १८ |
| झारखंड | १० | ०४ |
| हिमाचलप्रदेश | ०० | ०४ |
| गुजरात | ०७ | १९ |
| गोवा | ०२ | ०० |
| तेलंगणा | ११ | ०३(अन्य ३) |
| तामिळनाडू | ३९ | ०० |
| कर्नाटक | २५ | ०३ |
| केरळ | २० | ०० |
| बिहार | २९ | ११ |
| छत्तीसगड | ०९ | ०२ |
| उत्तरप्रदेश | ४३ | ३७ |
| उत्तराखंड | ०३ | ०२ |
| सिक्कीम | ०१ | ०० |
| त्रिपुरा | ०१ | ०१ |
| अरुणाचलप्रदेश | ०१ | ०१ |
| आसाम | ०८ | ०६ |
| मध्यप्रदेश | १० | १९ |
| लक्षद्विप | ०१ | ०० |
| पाँडेचरी | ०१ | ०० |
| आंध्रप्रदेश | ०२ | ३ (अन्य२०) |
| दिल्ली | ०५ | ०२ |
| लडाख | ०१ | ०१ |
| काश्मीर | ०६ | ०० |
| बंगाल | ३६ | ०६ |
| मणिपुर | ०२ | ०० |
| मेघालय | ०० | ०२ |
| मिझोरम | ०१ | ०० |
| नागालँड | ०१ | ०० |



## ‘उमटे’ गाळ काढण्याच्या संघर्षाला यश

■ **सामाजिक कार्यकर्ते अविनाश होळकर यांच्या हस्ते शुभारंभ**

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

उमटे धरणातील गाळ काढण्याच्या कामाला प्रत्यक्षात शुक्रवारी प्रारंभ झाला. त्यामुळे आता ४४ गावे आणि ३३ आदिवासी वाडीवर नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत मिळणार आहे. उमटे धरण संघर्ष ग्रुपने केलेल्या मागणीला शेकापने तातडीने प्रतिसाद दिल्याबद्दल नागरिकांनी आभार व्यक्त केले.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी शुक्रवारी उमटे येथे भेट दिली. त्यांनी सुरु असलेल्या कामाची पाहणी केली. उमटे धरणातील गाळ कित्येक वर्ष काढण्यात आला नव्हता. त्यामुळे तालुक्यातील ४४ गावासह ३३ आदिवासीवाडीवरील नागरिकांना दुषित पाण्याचा पुरवठा होत होता. याबाबत प्रशासनाकडे सातत्याने प्रश्न मांडण्यात आला. मात्र, प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे नागरिकांना अशुध्द पाण्याचा पुरवठा होत होता. महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती, तसेच येथील पर्यटन व्यवसायावर देखील विपरीत परिणाम होत असल्याने यातून मार्ग काढावा अशी विनंती उमटे धरण संघर्ष ग्रुप व परिसरातील स्थानिकांनी अनेक वर्षे शासनाकडे वारंवार विनंती केली होती. मात्र शेकापने मदतीचा हात पुढे केला. १७ मे रोजी उमटे •> पान २ वर

## रायगड विश्वजननी बँकेला टाळे?

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली बाजारपेठेत रायगड विश्वजननी भारत निधी अर्बन बँक सुरू होती. बँकेच्या व्यवस्थापक संचालकांनी नेमलेल्या एजंटमार्फत भुरळ घातली. दुकानदार दिवसभरात मिळणारा पैसा जमा करीत होते. काही दिवसांपासून एजंट पैसे जमा करायला का येत नाही. यासंबंधीची चौकशी करण्यासाठी ठेवीदार बँकेत गेले.परंतु,बँकेच्या मुख्य दरवाजाला कुलूप दिसले. खातेदारांनी आजूबाजूला चौकशी केली असता बँक अनेक दिवसांपासून बंद असल्याची माहिती मिळताच खातेदारांच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

बँक का बंद आहे, यासंदर्भातील माहिती मिळाली नसल्यामुळे बँकेच्या व्यवस्थापनावर कडक कारवाई करून आमचे पैसे मिळून द्यावे अशी मागणीचा •> पान २ वर

## हातगाड्यांना नगरपरिषदेचा दणका

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग समुद्रकिनारी वर्दळीच्या ठिकाणी हातगाडीद्वारे व्यवसाय करणाऱ्यांवर अलिबाग नगरपरिषदेने दणका दिला आहे. नगरपरिषद व अलिबाग पोलीस ठाणे यांनी संयुक्तरित्या शुक्रवारी कारवाई केली.




अलिबाग समुद्रकिनाऱ्याला पर्यटकांकडून पसंती दिली जात आहे. समुद्रकिनारी पर्यटकांचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे. सुट्टीच्या हंगामात पर्यटकांची समुद्रकिनारी वर्दळ वाढली आहे. त्यात पर्यटक समुद्रातील पाण्यात भिजण्याचा आनंद मनमुरादपणे घेत आहेत. मात्र समुद्रकिनारी वर्दळीच्या ठिकाणी काही हातगाडी चालकांनी खाद्य पदार्थ विक्रीचा व्यवसाय सुरू केला आहे. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने नगरपरिषदेने या व्यवसायिकांवर कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. मुख्याधिकारी •> पान २ वर

## मुंबई ते मांडवा जलवाहतूक

## २६ मेपासून बंद होणार


**। अलिबाग । वार्ताहर ।**



मुंबई ते मांडवा दरम्यान चालणारी जलवाहतूक सेवा २६ मे पासून बंद होणार आहे. पावासाळ्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे परिपत्रक मेरीटाईम बोर्डाने जारी केले आहे. दरम्यान भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान चालणारी रो रो जलवाहतूक सेवा नियमितपणे सुरु राहणार आहे.

मुंबईतील गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान जल प्रवासी वाहतूक केली जाते. पीएनपी, •> पान २ वर

## जंजिरा जलदुर्ग



**। मुरूड । प्रकाश सद्रे ।**

पर्यटन क्षेत्रात लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ असलेल्या महाराष्ट्रात मुरूड तालुक्यातील जंजिरा जलदुर्ग पावसाळ्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव २६ मे पासून ३१ ऑगस्टपर्यंत पर्यटकांना पाहण्यास बंद ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती अलिबाग-मुरूड पुरातत्व विभागाचे आधिकारी बजरंग येलीकर यांनी दिली. पावसाळ्यात खोरा जेट्टी अथवा राजपुरी जेट्टीवरून बाहेरून पाहता येईल मात्र समुद्रात जाण्यास बंदी असणार आहे.

बजरंग येलीकर पुढे म्हणाले की, समुद्रातील सुरक्षिततेच्या कारणास्तव दरवर्षी जंजिरा जलदुर्ग २५ किंवा २६ मेपासून पर्यटकांना आतून पाहण्यासाठी बंद केला जातो. पर्यटकांची सुरक्षितता महत्वाची आहे. •> पान २ वर

## पाणी टंचाईवर टँकरची मात्रा

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

■ **दहा तालुक्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ**
■ **३०७ गावे, वाड्यांमध्ये पाणी टंचाईचे संकट**

जिल्ह्यातील अलिबागसह १० तालुक्यांमध्ये पाणी टंचाईचे संकट उभे राहिले आहे. गावे, वाड्यांसह ३०७ ठिकाणी ४३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. तरीदेखील पाण्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होऊ लागली आहे. यावर ठोस उपाययोजना करण्यास प्रशासन उदासीन ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे.

रायगड जिल्ह्यात पर्यटन व औद्योगिकीकरण वाढत आहे. त्यामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढू लागली आहे. औद्योगिकीकरणाबरोबरच नागरिकीकरणामुळे पाण्याची मागणीदेखील वाढली आहे. लोकसंख्येबरोबर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे पाण्याची मागणी सतत वाढत असल्याने गोड्या पाण्याच्या स्त्रोतांचा पुरवठा मर्यादित राहतो. त्यामुळे उपलब्ध जलस्त्रोत लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करू शकत नाहीत, अशी पाणीटंचाईची स्थिती निर्माण झाली आहे.



जिल्ह्यातील अलिबाग, पेण, कर्जत, खालापूर, महाड, माणगांव, पनवेल, उरण, पोलादपूर, श्रीवर्धन या दहा तालुक्यांमधील ५६ गावे, २४१ वाड्यांमध्ये पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला आहे. पाण्यासाठी पायपीट करण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. पाण्या अभावी महिला वर्ग त्रस्त झाल्या आहेत. उन्हाळी सुट्टीमध्ये मुंबईतून गावी आलेल्या नागरिकांमध्येदेखील नाराजी निर्माण झाली आहे. पाणी टंचाईवर ठोस उपाययोजना करण्यास प्रशासन उदासीन ठरल्याने पाणी टंचाईवर टँकरची मात्रा देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यातील ३०७ ठिकाणी ४३ टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. शासनाच्या वेगवेगळ्या योजना पाणी पुरवठ्यावर राबवून करोडो रुपये खर्च केले जात आहेत.




शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन | खास ट्यून केलेले सस्पेन्शन | सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य) Exter: 60 l (पाणी समतुल्य) | कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन | डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग | RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले

HYUNDAI

3 YEAR 100 000km** Warranty Coverage | UPTO 7 YEARS Extended Warranty^ | 3 YEAR Unlimited** Kilometer Warranty | 3 YEARS Road Side Assistance (RSA)# | UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package | UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package

*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565

Give a missed call on 9555295868 | my Hyundai app | Hyundai Promise Certified Pre-Owned Car | Hyundai Cl!ck to Buy Scan here

*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 100 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.

शरयू ह्युंदाई पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111

विशाल ह्युंदाई पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907




# ठाण्यात भाजपाची अत्यंत वाईट अवस्था

## ■ निष्ठावंतांना डावलून गद्दारांना उमेदवारी

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

नरेंद्र मोदी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचा उल्लेख 'नकली शिवसेना' असा करीत आहेत. मात्र, आयारामांमुळे भाजपचीच अवस्था 'नकली भाजप' झाली आहे. रा.स्व.संघ व भाजपच्या ज्या मतदारांना भाजपची ही अवस्था अमान्य असेल त्यांनी खऱ्या हिंदुत्वाकरिता माझ्यासोबत यावे, असे आवाहन उद्धव सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी ठाण्यात केले.



दरम्यान, डोंबिलीतील सभेत भाजपचा आमदार गणपत गायकवाड याच्यांवर गोळीबार करण्याची वेळ का आली? याचा विचार भाजपच्या नेत्यांनी करावा आणि गायकवाड यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांची हिंमत असेल तर नरेंद्र मोदी यांनी चौकशी करावी, असे आवानही उद्धव ठाकरे यांनी केले. ठाण्यातील व कल्याणमधील महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे व वैशाली दरेकर-राणे यांच्या प्रचाराकरिता ठाकरे यांच्या सभा झाल्या. सभा सुरू होताच वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरू झाला. या पावसात भिजत उध्दव ठाकरे यांनी भाजपला लक्ष्य केले. मुसळधार पाऊस ही आपल्या विजयाची नांदी आहे. या असल्या पावसात आपली मशाल कधीच विझणार नाही. याउलट ती अधिक प्रज्वलीत होऊन भाजपसह कल्याण लोकसभेतील गद्दारांना आता गाडून टाकेल, असा विश्वास ठाकरे यांनी व्यक्त केला.

उद्धव ठाकरे म्हणाले की, ठाण्यात भाजपची अशी वाईट अवस्था झाली आहे की, त्यांच्याकडे लोकसभेकरिता उमेदवार नाही. जर त्यांच्याकडे उमेदवार असता तर विचारे यांच्यासमोर भाजपचा उमेदवार असता. मात्र, ठाण्यातील भाजप आता गद्दारांच्या सतरंजा उचलण्यापुरता राहिला आहे. शरद पवार यांनी दिलेल्या एका मुलाखतीनंतर शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार, असा प्रचार मोदींनी सुरू केला. गेली २५ वर्षे शिवसेना भाजपासोबत होती. तेव्हा भाजपमध्ये विलीन झाली नाही, तर आता कुठल्या पक्षात का विलीन होईल, असा सवालही त्यांनी केला.

### गद्दारांची पोरं कडेवर

**शिवसेना-भाजपची युती अभेद्य ठेवण्यात भाजपचे ज्येष्ठ नेते दिवंगत प्रमोद महाजन यांनी महत्वाची भूमिका बजावली. महाजन यांच्यामुळे भाजपला ओळख मिळाली. त्याच महाजन यांच्या मुलीला भाजपने उमेदवारी नाकारली. आपल्यावर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या भाजपने आता उपरे, गद्दारांची पोरं का कडेवर घेतली आहेत. भाजपचे दोन खासदार होते, त्यावेळी भाजपच्या वाढीसाठी खस्ता खाल्लेल्या महाजन यांच्या निष्ठावान मुलीला घरचा रस्ता आणि गद्दारांच्या पोरांना हे कडेवर घेऊन निवडून आणण्यासाठी चालले आहेत. म्हणजे निष्ठावानांना डावलायचे आणि कल्याणमध्ये गद्दाराच्या मुलाला उमेदवारी द्यायची. मग ही भाजपची वाटचाल संघाला मान्य आहे का, असा प्रश्न उध्दव यांनी केला.**

# महाराष्ट्रातील सुपारीची दुकाने होणार बंद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



पाचव्या टप्प्यातील महायुतीच्या सांगता सभेवरून संजय राऊतांनी राज ठाकरेंवर सडकून टीका केली आहे. ज्यांनी तुम्हाला महाराष्ट्रात येऊ देणार नाही असे म्हटले त्यांच्या मांडीला मांडी लावून बसतात, असे म्हणत संजय राऊत यांनी मोदींच्या राज ठाकरेंसोबतच्या सभेवर टीका केली. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते. तसेच, अजित पवारांना तुम्ही तुरुंगात टाकणार होता. चक्की पिसिंग, आता पिसिंगच्या ऐवजी किसिंग करतायत, असा ही टोला त्यांनी लगावला.

संजय राऊत म्हणाले, या निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील काही सुपारीची दुकाने बंद होणार. त्यातील राज ठाकरे यांचे एक दुकान आहे. तीन चार सुपारी शॉप इन पॉलिटिक्स बंद होणार आहेत. त्यातीलच एक हे दुकान आहे. महाराष्ट्रात कोणी येऊ दे, जितक्या सभा घेतील तितकी वाट लागेल. प्रधानमंत्री मुंबईत येऊन इतक्या सभा घेतात म्हणजे तुम्ही दहा वर्षात काही केलं नाही म्हणून येत आहेत. ज्यांनी तुम्हाला शिव्या घातल्या त्यांना मांडीवर घेऊन बसावे लागले नसते. राज ठाकरे ज्यांच्याबद्दल सवाल उठवतात त्यांच्याबरोबरच जातात ही राज ठाकरे यांची खासीयत आहे.

# आत्मविश्वास ढासळल्यानं धर्माच्या आधारे टीका : शरद पवार



**। नाशिक । प्रतिनिधी ।**

पंतप्रधान मोदींनी आत्मविश्वास गमावलाय त्यामुळे ते धर्म जात याविषयावर बोलत आहेत, अशी टीका शरद पवारांनी केली आहे. नकली शिवसेना आणि नकली राष्ट्रवादी पार्टी काँग्रेसमध्ये विलीन होतील अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली होती. या टीकेला शरद पवारांनी प्रत्युत्तर दिले आहे. दिंडोरी लोकसभेचे उमेदवार महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारार्थ नाशिकच्या मनमाड येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

शरद पवार म्हणाले, हा देश लोकशाहीला मानणारा आहे. मोदींची भूमिका बोलायची एक अन् करायची एक आहे. मोदी सत्ता आल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका थांबल्या. समाजातील लहान घटकांना आणखी लहान करण्याच्या प्रयत्न या सरकारने केला आहे. शरद पवार यांनी कृषी खात्याचे मंत्री होते तेव्हा काय केले, असा सवाल करत आहेत. यावर बोलताना शरद पवार म्हणाले, महाराष्ट्रात ७०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. कांद्यावर बंदी, साखरेवर बंदी सगळ्याच गोष्टीवर बंदी...नेमके काय चालले आहे. कष्टाने पिकवलेले बाजारपेठात गेले तर शेतकऱ्यांच्या पदरात चार पैसे पडतील. त्याचा संसार फुलेल.दी म्हणतात गरीबांना फुकट धान्य देता.,.. कांदा निर्यातबंदीचा प्रश्न महत्वाचा होता पण केंद्र सरकारने निर्यातबंदी उठवली नाही. मोदींचे सरकार हे फसवे सरकार आहे. यांच्यावर विश्वास ठेवता येणार नाही.

### कांद्याची निर्यात बंदी मी उठवली

**२००४ मध्ये कृषी मंत्री झालो तेव्हा अन्नधान्य आयात करावे लागले, अशी स्थिती होती. २०१४ मध्ये देश अन्नधान्य स्वयंपूर्ण होता. मी कांद्याची निर्यात बंदी उठवली, शेतकरी कर्जमाफी केली आणि विचारात शरद पवारांनी काय केले, असे शरद पवार म्हणाले.**

### मोदींना प्रत्युत्तर

**मोदी म्हणतात मी ८० टक्के लोकांना मोफत धान्य दिल, मात्र, हे अन्नधान्य पिकवतं कोण? याचे श्रेय शेतकऱ्यांचे आहे, याचे श्रेय जुन्या सरकारचे आहे आणि आम्हाला विचारात काय केले, असे म्हणत शरद पवारांनी नरेंद्र मोदींना उत्तर दिले आहे.**


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स. नं./हि. नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| सगिरूनिस्सा अख्तरआलम खान व इतर-२ | १५९/३/क | ००-१५-०० | २-०६ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अँडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०५/२०२४

**अ‍ॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३



### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे सावेळे, ता. कर्जत, जि.रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि.नं. | एकुण क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पैसे. |
|---|---|---|---|
| स्मिता शैलेश काळे कादंबरी शैलेश काळे | ५/२ | ००-२२-०० | २-४७ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १७/०५/२०२४

**अ‍ॅड. संजय हरिश्चंद्र म्हसे.**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३


## पान १ वरुन

## संघर्षाला यश

धरण संघर्ष ग्रुप व स्थानिकांच्या एकजुटीने नारळ वाढवून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

कामाचा शुभारंभ उमटे परिसरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अविनाश होळकर यांच्या हस्ते करण्यात आले. परिसरातील नागरिकांना ही नारळ वाढवण्याचा मान देण्यात आला.

शासनामार्फत धरणातील गाळ काढावा अन्यथा तो गाळ काढण्याची परवानगी सेंटर फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया या सामाजिक संस्थेला (सीएफटीआय) सीएसआर फंडातून परवानगी द्यावी, अशी मागणी शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले. या कामाला शासकीय मान्यता मिळाली आणि अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या सहभागातून कामाला सुरुवात सुद्धा करण्यात आली. एकजुटीने कामाला सुरुवात झाल्यामुळे स्थानिकांमध्ये उत्साह दिसून आला. परिसरातील उद्योजकांनी गाळ काढण्यासाठी, पोकलेन, जेसीबी, डंपर व इतर उपकरणे उपलब्ध करून द्यावी असे आवाहन उमटे धरण संघर्ष ग्रुपचे पदाधिकारी नंदेश गावंड यांच्यासह नागरिकांनीही केली आहे.

**उमटे धरणाचा गाळ काढण्यास सुरुवात होणे ही आमच्या विभागासाठी परिवर्तनाची नांदी आहे. शापीत गाळमुक्त धरणासाठी एक पाऊल पुढे येऊन सहकार्य करावे. चित्रलेखा पाटील व प्रशांत नाईक यांचे आभार मानतो. आमच्या अभियानाला मदत करणाऱ्यांचे आम्ही स्वागत करतो.-अ‍ॅड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप,**

**उमटे धरणाच्या पाण्यावरती अवलंबुन असणाऱ्या स्थानिक नागरिकांनी आपल्या कुटुंबासमवेत एकदा तरी उमटे धरणाला सदिच्छा भेट देऊन धरणाची परिस्थिती आणि जनजागृती करण्यासाठी सहकार्य करावे**

**-रुपेश पाटील,**
**स्थानिक तरुण उधोजक**

## रायगड विश्वजननी बँकेला टाळे?

तक्रारी अर्ज खोपोली पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरिक्षक शीतल राऊत यांच्याकडे केला आहे.खातेदारांचे पैसे बुडाल्याने खालापूर तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.

खोपोली शहरात अरिहंत टॉवर डी येथे एका गाळ्यात बँकेचे कार्यालय सुरू केले होते. दुकानदारांनी दररोजची रक्कम गोळा करण्यासाठी बँकेमार्फत एजंट नेमून खालापूर तालुक्यात व खोपोली शहरात बँकेची जाहिरात करून या बँकेचे मुख्य ऑफिस कर्जत शेलू येथे असल्याचे ग्राहकांना सांगितले होते. त्यामुळे अनेक दैनंदिन बचत खाते काढून त्यात रोजची रक्कम वसुली केली. वर्षभरात एक रकमी व्याजसह रक्कम मिळेल. या आशेवर असणाऱ्या ग्राहकांना बँक बंद झाल्याची माहिती मिळताच मोठा धक्काच बसला. अनेक ग्राहक चौकशीसाठी बँकेत गेले. परंतु, बँकेला टाळे असल्याने अनेक महिला ग्राहकांनी आरडाओरडा केला. त्याचवेळेस दररोज दैनंदिन रक्कम घेण्यासाठी येणारे एजंट यांना बोलविण्यात आले. त्यांनी ८ एप्रिलला अचानक बँकेला टाळे असल्याचे आम्हाला माहिती मिळाली. एजंट लोकांचा काम केलेला पगार ही दिला नसल्याचे ग्राहकांना सांगितले. त्यांनतर बँकेचे मॅनेजर मल्लारी सूर्यवंशी यांना दूरध्वनीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अनेक ग्राहक आर्थिक अडचणीत आले आहेत. त्यामुळे या बँकेच्या व्यवस्थापनावर कडक कारवाई व्हावी. यासाठी खोपोली पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देऊन आमचे पैसे मिळून द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत चौकशी सुरू आहे . लवकरच दोषींवर कारवाई होईल अशी माहिती पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी दिली आहे. बँकेचे व्यवस्थापन अधिकारी मल्लारी सर्यवंशी यांच्याशी दूरध्वनीवर प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांची बाजू समजू शकली नाही.

## जंजिरा जलदुर्ग

या कालावधीत समुद्राच्या मोठ्या लाटा उसळत असल्याने धोका निर्माण होऊ शकतो. यासाठी शासकीय स्तरावरून निर्णय घेतला जातो.२६ मे पासून जंजिऱ्याचे दरवाजे बंद करावेत अशा स्वरूपाचे आदेश मेरिटाईम बोर्ड आणि पुरातत्व खात्याला प्राप्त झाले आहेत. त्यानुसार निर्णय घेतला जाईल अशी माहिती बजरंग येलीकर यांनी दिली. २२ एकर जागेवर उभ्या असलेल्या जंजिऱ्यात १९ बुरुज आहेत. जंजिरा जलदुर्ग पश्चिम समुद्र किनारपट्टीवर बलदंड जलदुर्ग असून इतिहासात अपराजित जलदुर्ग मानला जातो. मुरूड तालुक्यातील राजपुरी समुद्र खाडीत ३५० वर्षापूर्वी उभारण्यात आलेल्या जंजिऱ्याचे बांधकाम चुनखडी आणि शिशाचे असून हा जलदुर्ग तत्कालीन स्थापत्यशास्त्राचा अजोड नमुना देखील मानला जातो. जंजिऱ्यात सुमारे १०० ते १२५ तोफा आहेत. पैकी लांडा कासम, गायमुख, कलाल बांगडी या तीन लांबपल्याच्या मोठ्या तोफा पंच धातूच्या असून अन्य लोखंडी आहेत. देश,राज्य आणि परदेशातून दरवर्षी सुमारे ५ लाख पर्यटक जंजिऱ्याला भेट देतात. दिवसेंगणिक ही संख्या वाढती आहे. खोरा जेट्टी, राजपुरी जेट्टी आणि दिघी जेट्टी या तीन ठिकाणाहून जंजिऱ्यात जाता येते. राजपुरी येथून शिडाच्या बोटीने तर अन्य दोन ठिकाणी मोटरलाँचने जंजिऱ्यात जाण्याची सुविधा उपलब्ध आहे. पाण्यात असलेल्या जंजिऱ्यात ज्येष्ठ नागरिक, छोटी मुले आणि पर्यटकांना सुरक्षित आणि सुलभपणे उतरता यावे, यासाठी जलदुर्गाच्या पाठीमागे समुद्राच्या बाजूकडून महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने प्रशस्त रुंद जेट्टी उभारण्याचे काम सुरू केले आहे. जंजिऱ्यात प्रवेश करण्यासाठी सध्या असलेल्या राजपुरी गावासमोरील प्रवेशद्वाराजवळ पर्यटकांना उभे राहण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने नवीन जेट्टीचे बांधकाम सुरू असून लवकरच सदर जेट्टीचे काम पूर्ण केले जाईल अशी माहिती प्रशासनाकडून उपलब्ध झाली आहे.

## मुंबई ते मांडवा जलवाहतूक

मालदार आणि अजंठा अशा तीन खाजगी ऑपरेटर्स मार्फत जल वाहतूक सेवा पुरवली जाते. दरवर्षी या मार्गावरून साधारणपणे १२ लाख प्रवासी मार्गावरून ये जा करत असतात. कोकणातील सर्वाधिक प्रवासी संख्या असलेला हा जलमार्ग म्हणून ओळखला जातो. या शिवाय या मार्गावरून खाजगी स्पीड बोटींची मोठ्या प्रमाणात वाहतुक सुरु असते.

पावसाळ्यात प्रवाश्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ही जल वाहतूक बंद ठेवण्यात येते. या काळात समुद्र खळवळलेला असल्याने बोटींना धोका उद्धवू शकतो त्यामुळे खबरदारी म्हणून तीन महिने ही बोट सेवा बंद ठेवण्यात येत असते. यंदा २६ मे पासून या मार्गावरील सर्व बोटसेवा बंद करण्याचे निर्देश मेरीटाईम बोर्डाने दिले आहेत. त्यानुसार गेट वे ऑफ इंडीया ते मांडवा दरम्यान चालणारी बोट सेवा बंद करण्यात येणार आहे.

## हातगाड्यांना नगरपरिषदेचा दणका

तथा प्रशासक अंगाई साळुंखे व अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्तरित्या कारवाई शुक्रवारी करण्यात आली. समुद्रकिनारी थाटलेल्या खाद्य पदार्थ विक्रेत्यावर कारवाई यावेळी करण्यात आली. पर्यटकांच्या सुरक्षेबरोबरच किनाऱ्यावरील स्वच्छतेसाठी ही कारवाई केली असल्याची माहिती नगरपरिषदेकडून देण्यात आली.

समुद्रकिनारी होणाऱ्या या कारवाईबाबत काहींकडून समाधान व्यक्त केले जात असताना काहींकडून नाराजीदेखील व्यक्त केली जात आहे. धुमस्टाईलने समुद्रकिनारी फिरविणाऱ्या बाईक पादचाऱ्यांसाठी डोकेदुखी बनत आहे. अनेक वेळा सकाळच्यावेळेला पादचाऱ्यांना या बाईकच्या कर्णकर्कश आवाजामुळे प्रचंड त्रास होतो. त्याकडे मात्र प्रशासन व पोलीस यंत्रणा दुर्लक्ष का करीत आहे, असा सवालदेखील अनेकांनी उपस्थित केला आहे.


### द नॅशनल को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.
वसुली विभाग : प्लॉट क्रमांक ८ सी, १ ला मजला, सेक्टर -१३, खांदा कॉलनी, नवीन पनवेल, रायगड, ४१० २०६ ई मेल तपशील : recovery@ncbmumbai.com दूरध्वनी क्रमांक : (०२२)२७४५ ८६२८

#### लिलाव विक्रीची सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ च्या अनुसार तसेच त्यासह वाचा त्या अंतर्गत बनविण्यात आलेल्या विविध नियमांच्या अनुसार खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या मालमत्तांची (संरक्षित मालमत्ता) जाहीर लिलावाच्या माध्यमातून विक्री जी मालक **श्रीमती सुषमा किरण प्रकाशे** यांनी द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्याकडे **श्रीमती सुषमा किरण प्रकाशे** यांना दिलेल्या वित्तीय साहाय्यासाठी प्रतिभूती म्हणून तारण ठेवण्यात आली आहे, त्या मालमत्तेची विक्री, रक्कम रु ३०,९७,११२. ०० लाख (रुपये तीस लाख सत्त्याण्णव मात्र) जी दिनांक ३०/०४/२०२४ रोजी येणे आहे तसेच त्यावरील पुढील व्याज दिनांक ०१/०५/२०२४ पासून आणि शुल्क आकार आणि अन्य खर्च, संपूर्ण रक्कम वसूल होण्याच्या तारखेपर्यंत, इतक्या रकमेच्या वसुलीसाठी करण्यात येणार आहे.

| मालमत्तेचे वर्णन | राखीव किंमत (रु लाखांत) | ईएमडी (रुपये हजारांत) | पाहणीची तारीख आणि वेळ | लिलावाची तारीख आणि वेळ |
|---|---|---|---|---|
| सदनिका क्रमांक १४, तिसरा मजला, त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स, सर्व्हे क्रमांक ६२,६१, ६१/७०, ७, ५ए, २/०, सीटीएस क्रमांक १६०५ आणि १६०६, प्लॉट क्रमांक ३६, मौजे चिंचवली शेकीन, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, ४१० २०३, क्षेत्र ६१३ चौरस फूट बीयुए. | रु १८.३९ लाख | रु १.८४ लाख | १५/०६/२०२४ सकाळी ११ ते संध्याकाळी ५. ०० | २०/०६/२०२४ सकाळी ११. ३० वाजल्यापासून |

**कर्जदार आणि हमीदार यांचे नाव आणि पत्ता : श्रीमती सुषमा किरण प्रकाशे, पत्ता :** रूम क्रमांक ८८४/६, पोल क्रमांक डी /१९, राणे चाळ, घोडबंदर रोड, डोंगरी पाडा, बुद्ध विहार जवळ, ठाणे ४०० ६१५; हमीदार : **१) श्री भावेश गोविंद अहिर** - पत्ता : रूम क्रमांक २०७, राणे चाळ, घोडबंदर रोड, डोंगरी पाडा, बुद्ध विहार जवळ, ठाणे ४०० ६१५; **हमीदार : २) श्री किरण भाऊसाहेब प्रकाशे, पत्ता :** रूम क्रमांक ८८४/६, पोल क्रमांक डी /१९, राणे चाळ, घोडबंदर रोड, डोंगरी पाडा, बुद्ध विहार जवळ, ठाणे ४०० ६१५; **हमीदार : ३) श्री संतोष राजाराम कदम : पत्ता :** रूम क्रमांक ९, चाळ क्रमांक ५/बी, श्री सिद्धिविनायक चाळ, देवीपाडा रोड, बोवलेकर जिमच्या समोर, देवीपाडा, बोरिवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६

**लिलावाचे ठिकाण :** द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड, प्लॉट क्रमांक ८- सी, सेक्टर १३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम) नवी मुंबई, ४१० २०६. दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५ ८६२८. ई मेल : recovery@ncbmumbai.com

**अटी आणि शर्ती :**

१) बोली अर्ज आणि विक्रीच्या अटी आणि शर्ती बँकेच्या वसुली विभाग कार्यालय प्लॉट क्रमांक ८-सी, सेक्टर १३, पहिला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), नवी मुंबई, ४१० २०६ येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते संध्याकाळी ५ या वेळेत प्राप्त करता येतील.
२) बोलीदार यांनी या बोली प्रक्रियेत लिलावाच्या दिवशी व्यक्तिशः सहभाग घेणे आवश्यक आहे तसेच बोली सीलबंद लिफाफ्यात वरील प्रमाणे नमूद केलेल्या ईएमडी रकमेसह आरटीजीएस / एनइएफटी यांच्या माध्यमातून किंवा पे ऑर्डर किंवा डीडी जो राष्ट्रीयकृत किंवा शेड्युल बँक यांचा आणि नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्या नावे मुंबई येथे देय असेल त्याच्या माध्यमातून अदा करणे आवश्यक आहे. सदरील सीलबंद लिफाफा द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड, वसुली विभाग यांचे प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे त्यांचे कार्यालय प्लॉट क्रमांक ८-सी, सेक्टर १३, पहिला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), नवी मुंबई ४१० २०६ येथे १९/०६/२०२४ रोजी संध्याकाळी ५ च्या पूर्वी प्राप्त होणे आवश्यक आहे. ईएमडी शिवाय प्राप्त झालेली बोली तसेच राखीव किमतीच्या खाली असलेली बोली यांचा विचार करण्यात येणार नाही. बोलीचे सीलबंद लिफाफे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या ठिकाणी आणि वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळी उघडण्यात येतील.
३) कोणतीही व्यक्ती जी या लिलाव प्रक्रियेत व्यक्ती अथवा कॉर्पोरेट आस्थापनेच्या माध्यमातून सहभाग घेणार असेल तर त्यांनी लेखी प्राधिकार प्रपत्र/संचालक मंडळाचा ठराव सादर करणे आवश्यक आहे.
४ ) बोलीदार यांनी केवायसी प्रपत्रे उदा पॅनकार्ड / रहिवासाचा पत्ता यांच्या पुराव्याची स्वयंसाक्षांकीत प्रत, एक पासपोर्ट आकाराचे छायाचित्र बोलीसह सादर करणे आवश्यक आहे तसेच मूळ कागदपत्रे लिलावाच्या ठिकाणी आणि वेळी पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.
५) मालमत्तेची विक्री ''जसे आहे जिथे आहे'' तसेच ''जे आहे ते आहे'' तत्वावर घेण्यात येणार आहे. आणि इच्छूक बोलीदार यांनी मालमत्तेवरील दावे, भार, कर देयके, अधिभार, अधिशुल्क आणि/ किंवा मालमत्तेच्या संदर्भातील अन्य देयके यांच्या संदर्भातील स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक आहे. आणि त्या देयकाची पूर्तता संबंधित बोलीदार यांनी करणे आवश्यक आहे. सदरील मालमत्तेच्या संदर्भातील देयके आणि देयता बँकेला ज्ञात नाहीत.
६) लिलावासाठी बोली प्रक्रिया प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त झालेल्या सर्वोच्च बोलीनंतर सुरु होईल त्यानंतर बोलीदार यांना आपली बोली रु ५,००० /- (रुपये पाच हजार मात्र ) ने वाढविण्याची अनुमती देण्यात येईल.
७) यशस्वी बोलीदार यांनी बोली रकमेच्या २५% रक्कम (ईएमडी रकमेसह ) बोली स्वीकृत झाल्यानंतर ताबडतोब म्हणजेच त्याच दिवशी संध्याकाळी ५. ०० पर्यंत किंवा कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी भरणा करणे आवश्यक आहे आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांत भरणा करणे आवश्यक आहे.
८) यशस्वी बोलीवर वरील प्रमाणे मुद्दा क्रमांक (७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे २५% रक्कम भरणा करण्यात अपयशी ठरल्यास भरणा केलेली ईएमडी रक्कम जप्त करण्यात येईल आणि विक्री प्रक्रिया रद्द झाली आहे असे मानण्यात येईल. त्याच प्रमाणे यशस्वी बोलीदार विक्री सुनिश्चित झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत खरेदी रकमेच्या ७५% रक्कम भरणा करण्यात असफल ठरल्यास बोलीदार यांनी भरणा केलेली २५% रक्कम बँकेकडून जप्त करण्यात येईल.
९) विक्री निश्चित झाल्यानंतर, अदायगीच्या शर्तींच्या पूर्ततेसाठी प्राधिकृत अधिकारी विक्री प्रमाणपत्र यशस्वी बोलीदार यांच्या नावे जारी करतील, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम २००२ च्या अनुसार आणि यशस्वी बोलीदार यांनी सर्व ते कर, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क आणि आकस्मिक खर्च जे प्रमाणपत्र यशस्वी बोलीदार यांच्या नावे करण्यासाठी आवश्यक आहेत ते अदा करणे आवश्यक आहे. प्राधिकृत अधिकारी संदर्भित मालमत्तेचा ताबा संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्यानंतर हस्तांतरित करतील.
१०) कोणतीही बोली स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता लिलाव प्रक्रिया पुढे ढकलण्याचा तसेच लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता लिलावाच्या अटी आणि शर्ती बदलण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
११) कोणत्याही भारांच्या संदर्भातील माहिती बँकेकडे उपलब्ध नाही.
१२) इच्छूक बोलीवर प्राधिकृत अधिकारी श्रीमती मधुरा अजय राऊळ, द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५ ८६२८ येथे मालमत्तेचा संपूर्ण तपशील जाणून घेण्यासाठी संपर्क साधू शकतात .

स्थळ : मुंबई
दिनांक: १७/०५/२०२४

स्वाक्षरी / -
**प्राधिकृत अधिकारी**
**द नॅशनल को ऑप बँक लिमिटेड**



### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031187** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-23/ 2024-2025.** RFx e-tender for Supply of Silica Gel, Cotton Cloth, Petroleum Jelly and Polythene Paper at various substation under EHV O&M Division Panvel. **Tender amount Rs. 4,97,456/-, EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **18.05.2024, 18:00 Hrs. to 26.05.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 26.05.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **27.05.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि, मौजे नागाव ता. अलिबाग जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. संजय गोपाळ वैद्य २) श्रीमती. कामिनी कमळाकर माळी ३) श्रीमती. कामिनी कमळाकर माळी ४) श्रीमती आशा मार्टिन पॉल ५) श्रीमती. स्वप्ना काशिनाथ देवतरासे ६) श्रीमती. स्मृती विजय प्रधान ७) श्री. सचिन दत्तात्रेय सातारे यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|
| नागाव ता. अलिबाग जि. रायगड | ५०३ | ०-०१-३० ०-००-१० एकूण ०-०१-४० |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही, अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक १८/०५/२०२४

**अ‍ॅड. सुहास शरद कारुळकर**
ऑफीस, रानडे निवास, 'तात्या रानडे मार्ग'
शिवलकर नाका अलिबाग - रायगड
मो. नंबर - ९९२१५५२९९१
९२७०२९४५४५



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्रीमती संगीता जयवंत कडवे, रा. सारळ यांच्या खाली नमुद मिळकतीचे वारसाहक्काने कायदेशीर मालक, वहीवाटदार तथा सहहिस्सेदार आहेत.

**मिळकतींचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | भुमापन क्र. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | धोकवडे | ५७३ | ०-५३-९० पो.ख. ०-०६-८० एकुण ०-६०-७० पैकी २० गुंठे विक्री केली असून ०-३३-९ पो.ख. ०-०६-८० एकुण ०-४० ७० एवढे क्षेत्र शिल्लक आहे. | १३- ४४ |
| २ | धोकवडे | ७८१ | १-८६-८० पो. ख. ०-११-५० एकुण १-९८-३० | ५०-८२ |

सदर मिळकतीचे अद्याप सरसनिरस वाटप झालेले नाही. तसेच सदर मिळकतीमध्ये अद्याप हिस्सेवारी करण्यात आलेली नाही. सदरहू मिळकत हि संपूर्णतः सामाईक मिळकत असून त्यामध्ये आमचे अशिलांच्या संमतीशिवाय कोणत्याही प्रकारे तात्पुरत्या अथवा पक्क्या स्वरूपाचे खोदकाम अथवा बांधकाम केल्यास त्यास आमचे अशिलांची सहमती नाही व त्यास आमचे अशिलांची कायम हरकत राहील.

तरी तमाम लोकांस कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकतीमध्ये त्यातील सहहिस्सेदार अथवा इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीने कोणत्याही प्रकारचे कच्च्या अथवा पक्क्या स्वरूपाचे खोदकाम अथवा बांधकाम करू नये त्याकरिता कोणत्याही प्रकारचे खोदकामाचे अथवा बांधकामाचे साहीत्य पुरवू नये. तसेच कोणत्याही स्वरूपाचा लिखीत अथवा अलिखीत करारनामा करू नये. तसेच आमचे अशिलांचे हक्कांत बाधा येईल असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये. तसे केल्यास आमचे अशिल अशा इसमांविरुध्द आवश्यक ती दिवाणी तसेच फौजदारी कारवाई करतील.

या अनुशंगाने आमचे अशिलांनी संबंधितांना दि. १३/०५/२०२४ रोजी कायदेशीर नोटीस पाठविली होती परंतू ती 'सदर मालक घेत नाही सबब परत' असा शेरा मारून परत आलेली आहे. त्या अनुषंगाने सदरची नोटीस संबंधितांवर बजावणी झालेली असल्याने त्याअनुषंगाने आमचे अशिलांचे सुचनेनुसार प्रस्तूतची जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

याची गांभिर्याने दखल घेण्यात यावी.
हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १७/०५/२०२४

सही/-
अशिलांची सही

सही/-
**(अ‍ॅड. तेजस्वी तळकर)**
जिल्हा न्यायालय,
रायगड अलिबाग.

**निवडक**

### कर्तव्याप्रति प्रेमाबद्दल कौतुक

**पनवेल :** शहर पोलीस ठाण्यात कर्तव्य बजाविणाऱ्या महिला पोलीस अंमलदार शितल रवींद्र कोकणी यांचे लग्न लोकसभा निवडणुकीच्या ३ दिवसापूर्वी झाले असताना ही कर्तव्याप्रति प्रामाणिकपणा दाखवून त्या त्वरित आपल्या कर्तव्यावर रुजू झाल्या. या त्यांच्या कर्तव्यदक्ष प्रेमाबद्दल पोलीस खात्यासह निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांचे कौतुक केले आहे. याकरिता शितल कोकणी यांचा यथोचित सन्मान करून त्यांच्या कर्तव्यप्रति प्रेमाची प्रशंसा करण्यात आली.

### नोटा छापणारा अटकेत

**पनवेल :** नवी मुंबई पोलिसांच्या मध्यवर्ती गुन्हे शाखेने तळोजा भागातील तोंडरे गावातील एका घरावर छापा मारुन बनावट नोटा छापणाऱ्या एका तरुणाला अटक केली आहे. प्रफुल्ल गोविंद पाटील (२६) असे या आरोपीचे नाव असून त्याने यु ट्युबवर पाहुन आपल्या घरातच बनावट नोटा छापल्याचे उघडकीस आले आहे. पोलिसांनी त्याच्या घरातून २ लाख ३ हजार रुपये किमंतीच्या बनावट नोटा तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे.

### संचालकावर गुन्हा दाखल

**पनवेल :** दिवाळखोरीत काढलेल्या सुप्रिया ट्रान्स्पोर्ट ऑर्गनायझेशन कंपनीची मालमत्ता विक्री करण्यास राष्ट्रीय लवादाने मनाई केली असताना कंपनीचे संचालक अमित अगरवालने या जमीनीचा एका व्यवसायीकासोबत १४ कोटी ३० लाख रुपयांमध्ये विक्री व्यवहार केला. त्यापैकी ७ कोटी ८६ लाख रु उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणातील कंपनीचा संचालकाच्या विरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

### महावितरणचा गलथान कारभार

**तळा :** शहरात महावितरण विभागाचा गलथान कारभार सुरू असून या वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभाराचा फटका सामान्य जनतेसह व्यावसायिक व विजेवर अवलंबून असणाऱ्या लहान मोठ्या व्यापाऱ्यांना सुद्धा बसत आहे. तळा महावितरण विभागाचे नियोजन नसल्याने तालुक्यातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. गुरुवारी आकाशात ढगाळ वातावरण होताच अवकाळी पावसाच्या हलक्या सरी कोसळण्याच्या आधीच तळा तालुक्यातील वीज पुरवठा खंडित करण्यात आला.

### मंदिरांत प्रवेशासाठी ड्रेस कोड

**श्रीवर्धन :** सुंदर सुशोभीकरण केलेल्या श्रीवर्धनच्या विस्तीर्ण समुद्र किनाऱ्यावर हजारो पर्यटक येत असतात. अलिकडे कधी कधी अत्यंत तोकडे कपडे घालून सार्वजनिक ठिकाणी येण्याची जणू स्पर्धाच लागलेली दिसते. काही दिवसांपूर्वी दिवेआगर येथील श्री सुवर्ण गणेश मंदिराच्या बाहेरील भिंतीवर लावलेला 'तोकडे कपडे घालून मंदिरांत येण्यास मनाई आहे', असे फलक लावण्यात आले आहे. असेच फलक श्रीवर्धनच्या प्रमुख देवळांच्या बाहेर लावणे गरजेचे असल्याचे म्हटले जात आहे.

# जिल्ह्यातील २४ धरणांनी गाठला तळ




**| अलिबाग | प्रतिनिधी |**

वाढत्या तापमानामुळे धरणांमधील पाण्याची पातळीदेखील दिवसेंदिवस कमी होत आहे. लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारित असलेल्या जिल्ह्यातील फक्त चारच धरणांमध्ये मुबलक पाणी पुरवठा आहे. मात्र, उर्वरित २४ धरणांनी तळ गाठला आहे. त्यामध्ये १२ धरणांमध्ये फक्त आठ दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक राहिले असल्याची माहिती समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यातील मुरूड, तळा, रोहा, पेण, अलिबाग, उरण या सहा तालुक्यातील प्रत्येकी एक तसेच सुधागडमधील पाच, श्रीवर्धनमधील तीन, म्हसळामधील दोन, महाडमधील चार, कर्जतमधील दोन, खालापूरमधील तीन, पनवेलमधील तीन अशा एकूण २८ धरणांद्वारे रायगडसह अन्य जिल्ह्यातील गावे, वाड्या, कंपन्या, व शहरी भागात पाणी पुरवठा केला जातो. सध्या तापमानात वाढ होत आहे. उन्हाचे चटके बसत आहे. त्यामुळे धरणांमधील पाण्याची पातळीदेखील कमी होत आहे. धरणांमधील पाणी दिवसेंदिवस कमी होत असल्याने पाण्याची समस्यादेखील गंभीर होण्याची भिती निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील फणसाड, श्रीगाव, कोथुर्डे, कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, उन्हेरे, अवसरे, कवेळे, रानीवली, कलोते- मोकाशी, डोणवत, या बारा धरणांमध्ये फक्त सहा ते २६ टक्के जलसाठा शिल्लक आहे. सुतारवाडी, आंबेघर, कार्ले, पाभरे, वरंध, खिंडवाडी, खैरे, साळोखे, भिलवले, मोरबे, बामणोली, पुनाडे या १२ धरणांमध्ये २९ ते ४९ टक्के तर आंबेघर, कुडकी, संदेरी उसरण या चार धरणांमध्ये ५९ ते ७१ टक्के पाणी शिल्लक असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे२८ धरणांपैकी १२ धरणांमध्ये आठ दिवस पाणी पुरेल इतके शिल्लक आहे. तर, अन्य बारा धरणांमध्ये पंधरा दिवस व चार धरणांमध्ये २५ दिवस पाणी पुरेल इतके शिल्लक राहिले आहे. रायगडसह नवी मुंबईला या धरणांमधून पाणी पुरवठा केला जातो. पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने कपातीकरणदेखील जोरात सुरु आहे.

### पाण्याचा वापर जपून करा

**धरणांमधील पाण्याची पातळी कमी झाली आहे. पावसाळा सुरु होईपर्यंत काही धरणांमध्ये पाणी शिल्लक आहे. तर काही धरणांमध्ये सहा ते पंधरा दिवस पुरेल इतके पाणी आहे. अनेक ठिकाणी कपातीकरण सुरु केले आहे. नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा. पाण्याचा अपव्य करू नये असे आवाहन लघुपाट बंधारे विभागाने केले आहे.**

# डिझेल तस्करांवर कारवाई

### तस्करांसह ५ टन बेहिशोबी डिझेल जप्त




**| उरण | वार्ताहर |**

अरबी समुद्रात अवैध डिझेलची तस्करी वाढत आहे. उरण, अलिबागच्या समुद्र हद्दीत अवैध डिझेल तस्करी जोमात सुरु आहे. या अवैध डिझेल टोळीविरोधात भारतीय तटरक्षक दलाने मोठी कारवाई केली आहे. गरूवारी (दि.१६) तटरक्षक दलाने 'जय मल्हार' नावाच्या मासेमारी जहाजातून काही अमली पदार्थांसह एकूण २५ हजार लिटर अवैध डिझेल जप्त केले आहे. या टोळीमध्ये एक प्रमुख म्होरक्या उरण तालुक्यातील माजी नगरसेवक असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे. मात्र, राजकीय वरदहस्तामुळे हा म्होरक्या अद्यापही कारवाईपासून दूर असल्याचे समजते.

तटरक्षक दलाच्या म्हणण्यानुसार, या कारवाईत ५ तस्करांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी मुंबई बंदरात नेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या २५ हजार लिटर डिझेलची किंमत सुमारे २७ लाख रुपये आहे. पकडलेल्या तस्करांनी चौकशीत मोठा खुलासा केला असून त्यांनी सुमारे ५ हजार लिटर डिझेल समुद्रात मासेमारी करणाऱ्या बोटींना विकल्याचे काबुल केले आहे. या यशस्वी मोहिमेमुळे समुद्रातील डिझेल तस्करी रोखण्यात भारतीय तटरक्षक दलाला यश आले आहे.

ही तस्करी गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम सुरू आहे. याबाबत अनेकवेळा स्थानिक ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासकीय अधिकारी आर्थिक हितसंबंधांमुळे कारवाई करण्यास चालढकलपणा करत आहे.



# उरणमध्ये काळ्या फिती लावून निषेध

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका यांना आर्वाच्च भाषेत अश्लील हातवारे करून शिवीगाळ करणाऱ्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी उरण पंचायत समितीच्या कार्यालयासमोर येथील ग्रामसेवक आणि ग्रामसेविकांनी जोरदार घोषणाबाजी करीत काळ्या फिती लावून निषेध व्यक्त केला.

तालुक्यातील हनुमान कोळीवाडा ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका सुप्रिया घरत या उरण पंचायत समिती येथे विस्तार अधिकारी विनोद मिंडे यांच्या दालनात माहितीच्या अधिकार कायाद्याअंतर्गत सुनावणीसाठी कर्तव्यावर हजर होत्या. यावेळी रविंद्र कोळी यांचे अर्जाबाबत विस्तार अधिकारी विनोद मिंडे यांच्याशी चर्चा करीत असतांना रविंद्र कोळी यांनी ग्रामसेविका सुप्रिया घरत यांना अश्लील हातवारे करीत आर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. याबाबत उरण पोलिस ठाण्यात घरत यांनी रविंद्र अनंत कोळी यांच्या विरोधात १५ मे रोजी तक्रार दाखल केली आहे.

# रात्र काढली अंधारात

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांत पावसाने थैमान घातला आहे. कर्जत, खालापूर, पनवेल, उरण तालुक्यात सोमवारी (दि.१३) सायंकाळी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस कोसळला. अलिबाग तालुक्यातील बेलोशी, महाजने, सागवाडी, मठवाडी, पाटवाडी येथील विज पुरवठा गुरुवारी सकाळी एक वाजता खंडीत झाला. त्यामुळे नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारातच काढावी लागली. उकाड्यामुळे झोपेवरदेखील परिणाम झाल्याचे दिसून आले. त्यामुळे संपूर्ण रात्र अंधारातच काढण्याची वेळ नागरिकांवर आली. अखेर महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सकाळी युध्द पातळीवर विजेची समस्या सोडविण्याचे काम करीत वीज पुरवठा पुर्ववत सुरु केला.

# धरण साठवण क्षेत्रात पारदर्शकता नाही



### कर्मचाऱ्यांच्या दुरुत्तरांमुळे ग्रामस्थ संतप्त

**| म्हसळा | वार्ताहर |**

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत म्हसळा शहरासाठी ४३ कोटी रुपयांच्या निधीची प्रशासकीय मान्यता मिळून लघु पाटबंधारे विभाग कोलाडच्या अंतर्गत असलेल्या पाभरे धरणातून म्हसळा नगरपंचायतीला पाणी पुरवठा करायचा आहे. या प्रकल्पाचे काम धरण साठवण क्षेत्रांत सुरु असून ते पारदर्शक नसल्याने तात्काळ थांबवावे, अशी मागणी पाभरे, अतीफ उकये, अमोल कदम, रुपेश घडशी, विनोद सुतार, गणेश चिपकूणकर आणि ग्रामस्थांनी केली आहे.

सद्यस्थितीत पाभरे धरणातून म्हसळा नगरपंचायतीसह तोडसुरे नळ योजनमधील गावांतील २० ते २२ हजार नागरिकांना पाणी पुरवठा होत असतो. नगरोत्थान महाभियानांतर्गत शहरासाठी ४३ कोटी रुपयांच्या या नवीन योजनेत धरणाच्या मूळस्त्रोतातून इनटेक वेलने आणि नंतर जॅकवेल ७५ पंपाने पाणी पुरवठा होणार आहे. सर्व योजना धरण क्षेत्राबाहेरीक जॅक वेल ने होत असताना नव्याने धरण साठयांत होणारी इनटेक वेल पाभरे पंचक्रोशीसाठी कळीचा मुद्दा ठरत आहे. त्याच कारणांनी ग्रामस्थ साईटवर गेले असता रविराज इंजीनीअर्स कोल्हापूर आणि निर्सग कन्सलटंटचे साईटवरील कर्मचाऱ्यांनी दिलेल्या दुरुत्तरांमुळे ग्रामस्थ संतप्त झाले होते.

महाराष्ट्र जिवन प्राधिकरण आणि नगरपंचायत प्रशासनाचा समन्वय नसल्याने धरणातील पाणीसाठा संपण्याची भिती ग्रामस्थांना वाटत आहे. प्रकल्पाच्या ठिकाणी योग्य आणि पारदर्शक माहितीचा फलक नसल्याने पाणीसाठा तालुक्यातील नियोजीत गोंडघर एमआयडीसीकडे वळविला जाण्याची भिती ग्रामस्थांना वाटत आहे. लघुपाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण आणि नगरपंचायत प्रशासनाने एकत्रित बसून कार्यान्वित आसणाऱ्या अन्य योजनाना पाणी पुरवठयाबाबत लेखी हमी द्यावी, अशी पाभरे ग्रामस्थांची मागणी आहे .

# वादळी वाऱ्यामुळे भयाण परिस्थिती



**| नेरळ | वार्ताहर |**

कर्जत तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसाने अनेकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले. चोरावले गावांत घराचे छप्पर उडून गेले तर काही घरांच्या भिंती कोसळल्या आहेत. शाळा, गोठे, झाडांची पडझड झाली आहे. जनावरे रस्त्यावर तर सर्वसामान्यांचा संसार मोडकळीस जाऊन आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने याचा पंचनामा करून लवकरात लवकर भरपाई मिळून द्यावी, अशी मागणी पुढे येत आहे. गारपीटीसह वादळी वारा यामुळे सर्वसाम्यान्याचे जीवनमान विस्कळीत झाले आहे. तसेच, वाकस ग्रामपंचायत हद्दीतील चोरावले गावात वादळी वाऱ्यामुळे विनोद शेळके, सुगंधा शेळके, वामन डायरे, मेघा डायरे यांची घरची पत्रे उडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.

# मीठ उत्पादनावर परिणाम

**| उरण | वार्ताहर |**

अखेरची घरघर लागलेल्या पारंपरिक मीठ उद्योगाला आता सातत्याने बदलणाऱ्या पर्यावरण आणि समुद्रातील वाढत्या मातीच्या भरावाचा उत्पादनावर ही परिणाम झाला आहे. त्यामुळे मीठ तयार होण्यासाठीचा कालावधी पंधरा ऐवजी ३० दिवसांवर पोचला आहे. रायगड जिल्ह्यातील किनारपट्टीवर मिठागरे हा मोठा व्यवसाय होता. यामध्ये उरण तालुका हा मीठ उत्पादक म्हणून अग्रेसर ठिकाण होते. मात्र, सिडकोच्या माध्यमातून येथील खाडी किनाऱ्यावरील शेत जमीनी बरोबरच मिठागरांच्या जमिनीही संपादीत केल्या आहेत.

# कोलाड परीसरात वादळाचा तडाखा



**| कोलाड | वार्ताहर |**

गुरुवार सायंकाळच्या सुमारास कोलाड परिसराला वादळवाऱ्याने मोठा तडाखा दिल्याने काही ठिकाणी घरांवरील कौले तसेच पत्रे उडाल्याने मोठे नुकसान झाले आहे.

रोहा तालुक्यातील काही भागांमध्ये गुरूवारी दुपारनंतर तुफान वादळ आणि अवकाळी पावसाचे रुद्रावतार पाहवयास मिळाले. कोलाड परीसरात या अवकाळी पावसामुळे भात शेतीसह फलबगायत तसेच विटभट्टी व्यवसायिकांचे मोठे नुकसान झाले. पुगाव येथील काही घरांवरील तर तेथील स्मशानावरील शेडचे पत्रे उडाल्याने मोठे नुकसान झाले आहे. तसेच, अवकाळी पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावरील वाकण ते इंदापूर दरम्यान काही काळ देखील वाहतूक ठप्प झाली होती. तसेच, गेली तीन दिवस दुपारनंतर वाऱ्या पावसाचा होत असलेला धुमाकूळामुळे कोलाड परिसरातील खांब, पुगावं, पुई, गोवे, मुठवली, शिरवली, कोलाड, वरसगाव, चिंचवली, तिसेसह येथील शेतकऱ्यांची उन्हाळी भात पिक संकटात सापडले असुन कापणीला आलेले पीक अवकाळी पावसाने झोडपले. त्यामुळ बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात असल्याचे दिसून येत आहे.

# सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन



**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरानमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ई-रिक्षा सुरू झाल्या आहेत. ई-रिक्षा सुरू झाल्यानंतर अश्वपाल संघटनेकडून सर्वोच्च न्यायालयात येथील पेव्हर ब्लॉकचे रस्त्याविरोधात धाव घेतली होती. त्यांनतर २७ एप्रिल रोजी त्या पेव्हर ब्लॉक बद्दल निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने आणखी आठ आठवडे कोणतीही कार्यवाही करू नये, असे आदेश आपल्या निर्णयात दिले होते. मात्र, माथेरान शहरात सुरू असलेल्या सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे कामासाठी काढण्यात आलेले पेव्हर ब्लॉक पुन्हा लावण्यात येत असल्याने कोर्टाचा अवमान माथेरान नगरपरिषद करीत असल्याचा दावा अश्वपाल संघटनेचे वकिलांनी केला आहे.

माथेरान मध्ये ई-रिक्षा सुरू झाल्यानंतर शहरातील पेव्हर ब्लॉकचे रस्त्यांवरून चालताना घोड्यांचे पाय सरकतात आणि अपघात होतात. त्यामुळे पेव्हर ब्लॉक माथेरान मधील रस्त्यांवर लावले जावू नयेत, अशी मागणी करणारी याचिका माथेरान अश्वपाल संघटना, मूलनिवासी अश्वपाल संघटना आणि मालवाहू अश्वपालक संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात केली होती. त्यात शहरातील घोड्यांच्या राईडचे रस्ते असलेल्या ठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉक लावले जाऊ नयेत, अशी मागणी त्या याचिकेत केली होती. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाने आदेश जारी करीत पुढे आदेश होई पर्यंत माथेरान शहरातील क्ले पेव्हर ब्लॉक लावण्याची सर्व कामे आठ आठवडे बंद करावीत. तसेच, शहरातील अन्य कोणत्याही रस्त्यावर पेव्हर ब्लॉक लावू नयेत, असे आदेश दिले होते.

त्याचवेळी कोर्टाचा अवमान होत असल्याची कृती पालिका करीत असून ठेकेदाराला त्याबाबत पालिकेने आदेश दिले आहेत काय, असा प्रश्न उपस्थित केला आहे. मात्र, पालिका त्याबाबत अश्वपाल संघटनेकडे लेखी हरकत घेण्याचे पत्र मागत असल्याने सर्वोच्च न्यायालयाचे वकील संतप्त झाले आहेत.

# दुबार भातशेती आर्थिक संकटात

### गारपीटीमुळे भाताच्या पिकाची नासाडी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यात अवकाळी पाऊस सुरू असून गारपीट पावसामुळे दुबार भाताची शेती संकटात सापडली आहे. राजनाला कालवा तसेच पाझर तलाव आणि लघुपाटबंधारे प्रकल्प या ठिकाणी केली जाणारी दुबार भाताची शेती पाण्याने भरल्याने शेतकऱ्यांची शेती खराब झाली आहे. दरम्यान, त्यानंतर भाताच्या शेतीचे नुकसान झाल्याने तब्बल ३० गावातील भाताच्या पिकाचे नुकसान झाले आहे. दरम्यान, या शेतीचे होत असलेले नुकसानाचे पंचनामे करावेत आणि शासनाने आर्थिक मदत करावी, अशी मागणी प्रगत शेतकरी दशरथ मूने यांनी केली आहे.**

गेली पाच दिवस कर्जत तालुक्यात अवकाळी पाऊस सुरू आहे. त्यात सर्वात मोठे नुकसान कर्जत तालुक्यात दुबार भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले. तालुक्यात राजनाला कालवा भागातील ४० गावातील शेतकरी भाताची शेती करतात. तर तालुक्यातील अवसरे आणि पाषाने येथील लघुपाटबंधारे प्रकल्प आणि खांडस, खांडपे, कशेले, साळोख, सोलनपाडा, डोंगर पाडा येथील पाझर तलाव यांच्या पाण्यावर भाताची शेती काही भागात शेतकरी करीत असतात. दुबार शेती ही हक्काची आणि खात्रीची असल्याने शेतकरी भाताची शेती करीत असतात. मात्र, यावर्षी अवकाळी पावसाने भाताच्या शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.

भाताची शेती करणारे शेतकरी हे साधारण मे महिन्यात भाताची कापणी करीत असतात. यावर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात अवकाळी पाऊस आला आणि तो अवकाळी पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. अनेक शेतात उभे असलेले भाताचे पीक तसेच काही ठिकाणी शेतकऱ्यांनी मजूर घेवून केलेले भाताची कापणी केली होती. ते सर्व भाताचे पीक शेतात पाणी साचल्याने भिजून गेले आहे. तर वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे भाताचे शेतात उभे असलेले पीक हे कोलमडून गेले आहे.



शेतकऱ्यांनी आपल्या या भावना कर्जत तालुका आणि रायगड जिल्ह्यातील कृषी अधिकारी यांच्यापर्यंत पोहचवल्या आहेत. जिल्हा परिषदेचे माजी सभापती पुंडलिक पाटील यांच्यासह दशरथ मुणे यांनी शासनाला पत्र देउन तत्काळ पंचनामे करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे कृषी विभागाने देखील तातडीने भाताचे नुकसान झालेल्या दुबार शेती असलेल्या भागाची पाहणी केली आहे.तसेच, उपविभागीय कृषि अधिकारी नितीन फुलसुंदर, अशोक गायकवाड, दिनेश कोळी आणि पर्यवेक्षक तसेच सहायक यांनी तालुक्यातील विविध भागात फिरून भाताच्या शेतीची पाहणी केली. दुबार भातशेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या साधारण ५० हेक्टर जमिनीवरील भाताचे पिकाची नासाडी झाली असून तालुक्यातील शेतकरी अवकाळी तसेच गारपीटीमुळे भाताचे पीक नुकसानग्रस्त झाले आहे.

# बे-कायद्याचे राज्य

सामान्य लोक त्यांच्या जगण्याच्या धावपळीत असतात. कायम नियम, कायदे कसोशीने पाळतात. एखादी चूक झाली तर पोलिस पकडतील अशी भीती त्यांना असते. हे कायद्याचे राज्य आहे असे राज्यकर्ते सतत सांगत असतात. या राज्यातला कायदा हा अशा निरुपद्रवी, सामान्य लोकांसाठीच असतो. जे पैशाने किंवा संघटनेने दांडगट असतात ते खुशाल अनेक कायदे मोडतात, नव्हे पायदळी तुडवतात. एरवी सामान्य लोकांना दरडावणारे सरकार त्यांना हातही लावू शकत नाही. किंबहुना, सरकारी यंत्रणा या कायदे मोडणाऱ्यांची नोकर असल्याप्रमाणे वागत असते. मुंबईतील घाटकोपर येथील होर्डिंग कोसळण्याच्या घटनेतून जे तपशील बाहेर येत आहेत ते यावरच शिक्कामोर्तब करणारे आहे. हे होर्डिंग १२० फुटाचे होते. आशियातील सर्वात मोठे होर्डिंग म्हणून लिम्का बुकमध्ये त्याची नोंद झाली होती. पण मुंबई महापालिका जास्तीत जास्त चाळीस फुटी होर्डिंगलाच परवानगी देत असते. हे अजस्त्र होर्डिंग उभे करायला किमान दहा-पंधरा दिवस लागले असतील. पण ते उभारले जात असताना पालिकेच्या अधिकाऱ्यांनी काहीही कारवाई केली नाही. नंतर जेव्हा त्याची विक्रमांच्या पुस्तकात नोंद झाली अशी जाहिरात करण्यात आली तेव्हा तरी किमान हे होर्डिंग बेकायदा आहे असे पालिकेने जाहीर करायला हवे होते. २०२२ पासून हे होर्डिंग अस्तित्वात होते. त्याला उपचारापुरत्या काही नोटिसा दिल्या गेल्या. पण ते तातडीने हलवावे अशी कोणतीही कारवाई पालिकेने केली नाही. अशाच प्रकारची अनेक होर्डिंग्ज मुंबईत आहेत असे आता दिसून आले आहेत. ही घटना ताजी असल्याने त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र त्यांच्यावर खरेच काही कारवाई होऊ शकेल का याबाबत शंका आहे. होर्डिंग लावले होते ती जागा रेल्वे पोलिसांच्या अखत्यारीत होती. पूर्वी सिंधुदुर्गाचे जिल्हाधिकारी असलेले खलिद कैसर यांनी या होर्डिंगला परवानगी दिली होती.

### बडतर्फ करा

एकशेवीस फूट म्हणजे सुमारे दहा ते अकरा मजली इमारतीच्या आकाराइतके हे होर्डिंग उभारण्यासाठी तितकाच मजबूत सांगाडा असणे आवश्यक होते. त्या सगळ्याचे एकत्रित वजन सुमारे अडीच लाख किलो किंवा २५० टन इतके होते. इतका ऐवज जमिनीवर उभारायचा तर त्याचा पाया मजबूत हवा. प्रत्यक्षात केवळ पाच-सहा फूट खोल पाया घेऊन ते उभे करण्यात आले होते. सोमवारी अचानक वादळ झाले व हे होर्डिंग पडले. हा अपघात झाला नसता तर ते आणखी कित्येक वर्षे तेथेच राहिले असते. आता मध्य व पश्चिम रेल्वेच्या जमिनीवरील जी होर्डिंग्ज आहेत त्यांना पालिकेचा चाळीस फुटांचा नियम लागू आहे की नाही याची चर्चा चालू आहे. गावाबाहेर मोकळ्या रानावर शंभरच काय हजार फुटांची होर्डिंग्जही लागू शकतील. पण मुंबईतील गर्दी, वाहतूक, जागेची उपलब्धता इत्यादी गोष्टी लक्षात घेऊनच पालिकेने हा नियम केला आहे हे उघड आहे. रेल्वेचे खाते केंद्राच्या अखत्यारीत येते म्हणून त्याला हा नियम लागू होत नाही असे म्हणणे ही अरेरावी व मूर्खपणा आहे. अशाने पुन्हा आणखी अपघात होत राहतील. दरम्यान, हे होर्डिंग ज्या पेट्रोल पंपावर पडले तो पंपही बेकायदा असल्याचे आता दिसून आले आहे. त्याने पूर्णत्वाचा वा रहिवासाचा दाखलाच मिळवलेला नव्हता. मुळात ही पंपाची जागाही रेल्वे पोलिसांच्या मालकीची आहे. त्या पंपातून मिळणारे उत्पन्न पोलिस कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी वापरले जाते, असे दाखवले जाते. त्यात किती तथ्य आहे हा वेगळ्या तपासाचा विषय आहे. आता या सगळ्याची चौकशी होईल. हा सांगाडा सक्षम असल्याचे प्रमाणपत्र देणारे अभियंते, या होर्डिंगच्या मालकाला नोटिसा बजावून स्वस्थ बसणारे पालिका अधिकारी आणि पालिकेला दाद न देणारे रेल्वेचे अधिकारी यांना खरे तर सेवेतून तात्काळ बडतर्फ करायला हवे. तसेच होर्डिंगच्या मालकाप्रमाणेच यांच्यावरही सदोष मनुष्यवधाचा खटला भरायला हवा.

### अधिकाऱ्यांचा हैदोस

सर्वात महत्वाचे म्हणजे हा खटला जलदगती न्यायालयात चालवून सर्वांना अत्यंत कठोर अशी शिक्षा व्हायला हवी. तरच इथल्या बेपर्वा, बेमुर्वत यंत्रणेला व तिला पाठीशी घालणाऱ्या बे-कायद्याच्या व्यवस्थेला चाप बसेल. आपल्याकडे अशा सर्व दुर्घटनांचे राजकारण केले जाते. या प्रकरणातही मुख्य आरोपी भावेश भिंडे याचे कोण्या राजकारण्यांबरोबरचे फोटो व्हायरल करून राजकीय आरोप सुरू झाले. अशा राजकारणामुळे बाकी काही साध्य होत नाही. त्यात अडकलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवरचा फोकस मात्र आपोआप कमी होतो व ते कसे निसटतील याची व्यवस्थित काळजी या अधिकाऱ्यांचे नोकरशाहीतील भाईबंद घेतात. या प्रकरणातही हेच होण्याची दाट शक्यता आहे. कारण बरेच निर्णय आयएएस वा आयपीएस यांच्या पातळीवर घेतले गेले आहेत. या बे-कायदा बाबूंना अशा प्रकरणात शिक्षा झाल्याचे एकही उदाहरण ऐकिवात नाही. फार तर त्यांची पदोन्नती रोखली वगैरे जाईल. मात्र सोळा निष्पाप लोकांचे बळी आणि सुमारे शंभर लोक जखमी झाले त्याला जबाबदार धरून यांना तुरुंगात जावे लागले असे कधीच घडत नाही. पेट्रोल पंपाचे प्रकरणही गुंतागुंतीचे आहे. ही जागा पालिका आराखड्यानुसार, रेल्वे पोलिसांच्या निवासासाठी राखीव आहे. मात्र तिचा पंपासाठी वापर केल्याचे दाखवले जाते. हा पंप चालवण्यासाठी अर्थातच एका ठेकेदाराची नेमणूक करण्यात आली आहे. ही आरक्षित जागा भलत्याच कामासाठी वापरली जात असल्याबद्दल यापूर्वी खटला दाखल झाला होता. पण नंतर तो बंद करण्यात आला. हे का झाले हे आता उघड व्हायला हवे. शिवाय, या पंपाचे उत्पन्न नेमके किती व पोलिसांना त्याचा किती फायदा होतो हे तपासायला हवे. पोलिसांसारख्या यंत्रणांनी उत्पन्न मिळवण्यासाठी असले धंदे करावेत किंवा त्यांना करायला लागावेत हेच आक्षेपार्ह आहे. रेल्वे पोलिस हे केंद्राच्या अखत्यारीत येत असल्याने ते स्थानिक पालिका तसेच मुंबई पोलिसांना जुमानत नसल्याचे दिसते. याचाही तपास व्हायला हवा.

विचार

# कमजोर उद्योगक्षेत्रांकडे लक्ष हवे

**‘क्रिसिल’ या पतमानांकन संस्थेने औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या बारा उद्योगक्षेत्रांच्या कामगिरीमध्ये सुधारणा अपेक्षित असल्याचे म्हटले आहे. भारताने वित्तीय शिस्त बऱ्यापैकी ठेवली असून जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, अशा शब्दांमध्ये जागतिक नाणेनिधीनेही अलिकडेच प्रशंसा केली आहे. मात्र यामुळे हुरळून न जाता, कमजोर पडलेली उद्योगक्षेत्रे भरभराटीस आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.**



**हेमंत देसाई**

लोकसभा निवडणुकांचे पर्व सुरू असल्यामुळे सत्ताधारी पक्ष अर्थव्यवस्थेचे गुलाबी चित्र रंगवत असेल, तर त्यात आश्चर्य नाही. कोणत्याही पक्षाचे सरकार असले तरी असेच घडते. निवडणुकांच्या वेळी आश्वासनांची पोतडी लोकांपुढे उघडली जाते. परंतु निवडणुका संपल्यानंतर ती आश्वासने विसरली जातात किंवा वास्तवाचा विचार करून त्यांना कात्री लावली जाते. मात्र आज देशातील कॉर्पोरेट क्षेत्राची स्थिती काय आहे, हे पाहण्याची गरज आहे. याचे कारण, शेतीची स्थिती समाधानकारक नाही आणि शेतकरी किमान हमीभावासाठी लढत आहेत. अशा वेळी उद्योग क्षेत्राकडून अर्थव्यवस्थेची अधिक अपेक्षा आहे. भारतीय कंपन्यांकडून २०२३-२४ च्या जानेवारी ते मार्च या चौथ्या तिमाहीमध्ये केवळ चार ते सहा टक्के महसूलवृद्धी नोंदवली जाण्याची शक्यता आहे. हे आकडे थोडे उशिरा समोर येतात. सप्टेंबर २०२१ नंतरची ही सर्वात कमी अशी ही महसूलवाढ आहे. भारतातील ‘क्रिसिल’ या अग्रगण्य पतमानांकन संस्थेने औद्योगिक क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ४७ कंपन्यांच्या कामगिरीचे परीक्षण केले तेव्हा केवळ बारा उद्योगक्षेत्रांच्या महसुलात सुधारणा करणे अपेक्षित आहे, असे आढळले. मुख्यतः उपभोग्य उत्पादने आणि सेवांनी जानेवारी ते मार्च या तिमाहीमध्ये चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन करणे अपेक्षित आहे. प्रवासी वाहनांच्या वाढत्या विक्रीमुळे आणि गेल्या वर्षात किमतीत वाढ झाल्यामुळे वाहननिर्मिती क्षेत्राच्या कामगिरीला चालना मिळाली आहे. तसेच संघटित किराणा क्षेत्र हे सलग तेरा महिने प्रगती दर्शवत आहे. परंतु बांधकाम संबंधित क्षेत्रांमधील महसूल कमी वेगाने वाढण्याची भीती आहे. शहरांमध्ये रिकाम्या फ्लॅट्सची संख्या भरपूर असून मागणीही कमी आहे. त्यामुळे किमती दबावाखाली आहेत.

एकंदरीत, भविष्यकाळात योग्य पावले टाकल्यास व्यापार-उद्योगाची स्थिती नक्की बदलू शकते. उद्योगधंद्यांना वेळेवर आणि पुरेसे भांडवल आवश्यक असते आणि नियमित कर्जपुरवठा होणेदेखील गरजेचे असते. ३१ मार्च २०२४ अखेरीस उद्योग आणि सेवाक्षेत्रांना मिळणाऱ्या कर्जामध्ये साडेबारा टक्क्यांची वाढ झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालानुसार उद्योगांकडून येणे असलेल्या बँक कर्जांची एकूण रक्कम ८२ लाख कोटी रुपये इतकी आहे. मागच्या वर्षी ही आकडेवारी ७१ लाख कोटी रुपये एवढी होती. एचडीएफसी बँक आणि एचडीएफसी लिमिटेड यांच्या एकत्रीकरणानंतर नव्या खासगी कंपनीची क्षमतादेखील वाढली आणि कर्जपुरवठासुद्धा. यातील बड्या उद्योगांना होणाऱ्या कर्जवाटपात मागच्या वर्षी तीन टक्क्यांची वाढ होती तर २०२३-२४ मध्ये हे प्रमाण सात टक्क्यांवर गेले आहे. दूरसंचार क्षेत्रातल्या कंपन्यांनाच २७ टक्के अधिक कर्जांचे वाटप करण्यात आले. गेल्या काही वर्षांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपन्यांमधील काही कंपन्या या ऊर्जाक्षेत्रावर भर देत आहेत. या कंपन्यांना सरकारी योजना आणि सवलतींचाही फायदा होतो. बँका एकूण कर्जपुरवठ्यातील ५५ टक्के कर्जे अशा कंपन्यांना देतात. वर्षभरात हा हिस्सा १४ टक्क्यांनी वाढला आहे. त्यात बजाज फायनान्ससारखी आघाडीची वित्तीय कंपनी आता पुन्हा जोमाने काम करू शकेल. याचे कारण, १५ नोव्हेंबरला रिझर्व्ह बँकेने डिजिटल कर्जविषयक मार्गदर्शक तत्वे आणि आवश्यक तरतुदींचे पालन न केल्यामुळे कंपनीच्या ईकॉम आणि इन्स्टा ईएमआय कार्ड या दोन योजनांवर निर्बंध घातले होते. आता हे निर्बंध हटवण्यात आल्यामुळे दोन्ही व्यवसाय विभागांमध्ये तेजी येणार आहे.

अर्थव्यवस्थेत खाजगी गुंतवणुकीप्रमाणेच सार्वजनिक गुंतवणूकदेखील होणे महत्त्वाचे असते. सरकारने सर्वच क्षेत्रांमधून अंग काढून घेतल्यास संकटे निर्माण होऊ शकतात. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सार्वजनिक गुंतवणूक हा एक महत्त्वाचा प्रेरणादायी घटक आहे आणि त्यामुळेच भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनली असल्याचे मत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केले आहे. सार्वजनिक गुंतवणूक ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट वस्तू, पायाभूत सुविधा किंवा सेवा प्रदान करण्याच्या गरजेतून उद्भवली आहे. ती राष्ट्रीय हिताची आहे. औद्योगिकीकरणाचा परिणाम म्हणून सार्वजनिक गुंतवणुकीमध्ये वाढ झाली आहे आणि शहरी समुदायांच्या वाढीसाठी नवीन पायाभूत सुविधांची मागणी आहे. एकविसाव्या शतकाच्या शेवटी, राज्य उद्योगांचे खासगीकरण आणि बाजारांच्या नियंत्रणमुक्तीमुळे खासगी आणि गैरनफा क्षेत्रांद्वारे प्रदान केलेल्या वस्तू आणि सेवांवर सार्वजनिक खर्चात वाढ झाली. सार्वजनिक गुंतवणूक हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा चालक घटक आहे. या कारणामुळेच ती जगातील सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनली आहे. आशिया आणि प्रशांत क्षेत्रातील अनेक अर्थव्यवस्थांमध्ये ऊर्जेच्या किमती कमी झाल्यामुळे महागाई नरमण्याची शक्यता आहे; मात्र अन्नधान्याच्या किमतीचा दबाव कायम आहे, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या टिप्पण्यांमध्ये म्हटले आहे.

‘आयएमएफ’ने या महिन्याच्या सुरुवातीला २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी वाढीचा अंदाज ६.५ टक्क्यांवरून ६.८ टक्क्यांपर्यंत वाढवला होता आणि २०२५-२६ साठी ६.५ टक्के वाढीचा अंदाज कायम ठेवला होता. भारत आणि फिलिपिन्स देशांतर्गत लवचिक मागणीमुळे सकारात्मक वाढ कायम राखू शकले. ‘आयएमएफ’ने आशिया-प्रशांत प्रादेशिक वाढीचा अंदाज ४.५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे; जो सहा महिन्यांपूर्वीच्या तुलनेत ०.३ टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये महागाई मोठ्या प्रमाणात आटोक्यात राहणे अपेक्षित आहे. ऊर्जेच्या किमती कमी झाल्यामुळे अनेक अर्थव्यवस्था महागाईमध्ये आणखी घसरणीचा अनुभव घेऊ शकतात तर भारतामध्ये तांदळाच्या बाबतीत डिसइन्फ्लेशन म्हणजे किमती घसरण्याचा वेग तात्पुरता मंदावण्याची शक्यता आहे. म्हणजेच अल्पावधीसाठी चलनवाढीचा ताण कमी होण्याची आशा आहे. आशियाई देश विनिमय दराच्या चढ-उताराचा सामना करण्यासाठी पूर्वीपेक्षा अधिक चांगल्या स्थितीत आहेत; मात्र उच्च कर्ज, व्याज खर्चाचे ओझे कमी करण्यासाठी आणि मध्यम-मुदतीच्या संरचनात्मक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी वित्तीय एकत्रीकरणास प्राधान्य देणे आवश्यक आहे. वित्तीय एकत्रीकरण म्हणजेच अर्थसंकल्पीय तूट कमी करण्यासाठी आणि अर्थव्यवस्थेच्या आकाराशी संबंधित कर्जपातळी स्थिर करण्यासाठी सरकारने आवश्यक उपायोजना करणे गरजेचे आहे. भारतात सार्वत्रिक निवडणुकीचे वर्ष असूनही वित्तीय शिस्त कायम ठेवण्यात आली आहे. यामुळे अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली राहणार असून जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, असेही आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने कौतुकाने म्हटले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात अनेक पायाभूत क्षेत्रांमध्ये खासगी गुंतवणूक येत नव्हती. कारण त्यात चटकन नफा मिळणार नव्हता. अशा वेळी पंडित जवाहरलाल नेहरूंनी विविध क्षेत्रांमध्ये सार्वजनिक उद्योगधंदे स्थापन केले. आता नव्याने सार्वजनिक उपक्रम स्थापण्याची गरज नाही. परंतु खासगी गुंतवणूक अजिबातच येत नसलेल्या क्षेत्रांमध्ये प्रथम सरकारने गुंतवणूक करणे किंवा सार्वजनिक आणि खाजगी भागीदारी प्रकल्प स्थापन करणे अथवा खासगी कंपन्यांना आवश्यक ते भागभांडवल उपलब्ध करून देणे या बाबी जरूरीच्या आहेत. भारताने वित्तीय शिस्त बऱ्यापैकी ठेवली असून जगातील आघाडीच्या देशांमध्ये भारताचे स्थान कायम राहील, अशा शब्दांमध्ये नाणेनिधीने प्रशंसा केली आहे. परंतु यामुळे हुरळून न जाता, कमजोर पडलेली उद्योगक्षेत्रे भरभराटीस आणण्याच्या दृष्टीने सरकारने उपाययोजना केल्या पाहिजेत. त्यातूनच उद्याच्या सक्षम अर्थव्यवस्थेचे स्वप्न पेलणे भारताला शक्य होणार आहे.

आजकाल

# नरूची परीक्षा



**किशोर देशपांडे**

नरूच्या शाळेत दर वर्षी एका प्रमुख विषयाची परीक्षा घेत असत. यंदाचा विषय होता ‘अर्थशास्त्र’. पेपर सोडवून नरू घरी आल्याआल्या चिडचिड करू लागला.

त्याचे बाबा मोहनराव शांत स्वभावाचे विचारी गृहस्थ होते. नरूला त्यांनी चिडण्याचे कारण विचारताच तो उसळून म्हणाला, ‘‘बाबा या राहुल्याचा मी असा बंदोबस्त करेन की तुम्ही पहातच रहा.’’

**बाबा** :-‘‘अरे पण आता परीक्षा सुरू आहे ना, मग तिथे त्याने काय गोंधळ केला?’’

**नरू** :- बाबा, तो चक्क चिटींग करत होता. माझ्या मागेच बसला होता, आणि बाजूच्या अब्दुल्याला उत्तरं पुरवत होता. मला सारखं मागे वळून त्याच्यावर लक्ष ठेवावं लागलं. मी पर्यवेक्षकांकडे त्याची २-३ दा तक्रारही केली. पण त्यांनी त्याचा पेपर हिसकावून घेतला नाही. याचाच मला संताप आला आहे.

**बाबा** :- बाळ नरू, तू सारखा सारखा त्या राहुलची टेहेळणी करून तक्रारी केल्या, पण स्वतःचा पेपर तरी पूर्ण व्यवस्थित सोडवलास की नाही? मी तुला म्हटलं होतं की अर्थशास्त्र कठीण विषय आहे. आपल्या घराण्यात कोणालाही त्या विषयात रुची नव्हती. तेव्हा तू निदान निर्मला, मुकेश, गौतम यांच्याकडून तरी तो विषय नीट समजून घ्यायला हवा होता.

**नरू**:- बाबा, काळजी करू नका. त्या निर्मलाशी कशाला बोलू? आणि मुक्या, गौत्या यांना काय माझ्यापेक्षा जास्त अक्कल आहे? मागच्या दोन्ही परीक्षांमध्ये मी त्या राहुलला धोबीपछाड देऊन पहिला नंबर मिळवला, हे विसरू नका. आणि यंदा तर मी ५०० पैकी ४०० मार्क मिळवणारच!

**बाबा** :- नरू बाळा, मला तुझी काळजी वाटते रे. तुमचा पहिला पेपर इतिहासाचा होता. आपले देवदेवता हे इतिहासाचा विषय नसून आस्थेचा विषय आहेत, असं तू मोठया आणि सुवाच्य अक्षरात लिहिलेलं उत्तर परीक्षकांना खूप आवडलं, म्हणून तुझा पहिला नंबर आला. त्यानंतर दुसरा पेपर राज्यशास्त्राचा होता. परचक्रापासून आणि अंतर्गत शत्रूंपासून राष्ट्राचे संरक्षण करणे, हेच राज्यशास्त्र होय, असं तू पेपरात लिहिलंस.आणि पुन्हा परीक्षक जास्त खुश झालेत. तुला दुसऱ्यांदा पहिला नंबर मिळाला. पण हा तिसरा पेपर अर्थशास्त्राचा आहे. तो राहुल बऱ्यापैकी अभ्यास करून आकडेवारी पण गोळा करत असल्याची जाणीव मी तुला अधूनमधून करून देत होतो.पण तुझा अति आत्मविश्वास, राहुलद्वेष आणि अहंकार तुला पास होऊ देणार नाही, असं वाटतच होतं. तू पेपरमधल्या सर्व प्रश्नांची उत्तरं लिहिलीस की नाही ?

**नरू** :- बाबा, देश कसा बरबाद होणार आहे, स्त्रियांचे दागिने, शेतकऱ्याच्या म्हशी कशा चोरल्या जातील, हे मी अगदी सविस्तर लिहिलं. फक्त सर्वांना काम कसे मिळेल आणि महागाई कशी रोखता येईल, यावर मला उत्तर माहीत नव्हतं, म्हणून मी त्या प्रश्नांवर उत्तरच दिलं नाही. काय उत्तर असेल हो?

**बाबा**:- गाढवा, मला तरी उत्तर कुठून माहीत असणार. अर्थशास्त्र समजून आपण चाणक्याचा अभ्यास केला, पण त्यात राज्यशात्रच जास्त. आणि जे काही अर्थशास्त्र असेल ते या काळात उपयोगी नाही. बघूया काय निकाल लागतो तुझा. कधी लागणार ?

**नरू** :- चार जून !

लोकसंसद

## हवाई प्रवास भाडे वाढता वाढे

हवाई प्रवास आता कौतुक राहिले नसून तो सर्वसामान्यांच्या आवाक्यात आला आहे. मात्र गेल्या काही काळापासून देशांतर्गत विमानसेवेचे भाडे सातत्याने वाढत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या हवाई प्रवासाला खीळ बसत आहे. विशेषतः कोविड काळानंतर विमान प्रवाशांच्या वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अलीकडेच ४.५६ लाख प्रवाशांनी देशांतर्गत विमान प्रवास करून एक अनोखा विक्रम केला. देशातील हवाई प्रवाशांची मासिक संख्या अंदाजे १.२ ते १.३ कोटी इतकी आहे. हवाई भाड्यात वाढ होण्यामागे अनेक कारणे दिली जात आहेत. इंधनाच्या किमतीत झालेली वाढ असून २०१९ पासून इंधनाच्या किमती ७६ टक्क्यांनी वाढल्या आहेत. विमान कंपन्यांचे इतर खर्च १० टक्के महागाईच्या दराने वाढत आहेत. एकीकडे विमान प्रवाशांची वाढती संख्या आणि दुसरीकडे कमी झालेली विमान उड्डाणे यामुळेही विमानाच्या भाड्यात वाढ होत आहे. याचा सर्वात जास्त फटका आंतरराष्ट्रीय विमान प्रवाशांपेक्षा देशांतर्गत प्रवास करणाऱ्या विमान प्रवाशांना अधिक बसत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीचा हंगाम असल्याने मे महिन्याच्या अखेरपर्यंत प्रवाशांना या दरवाढीचे चटके सहन करावे लागणार आहेत.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

मराठी साहित्यिक दिनविशेष

**१८ मे**

**१८८५:-** कथा-कादंबरीकार वि. सी. गुर्जर याचा जन्म. त्यांनी मराठी कथेत असलेली पारंपरिक नीतिमत्ता आणि बोधप्रदता बाजूला सारून रंजकता आणली. त्यांनी ‘रमेशचंद्र दत्त’,‘रवींद्रनाथ ठाकूर’, ‘शरच्चंद्र चटर्जी’,ह्यांचे मराठी अनुवाद केले. ‘जीवन संध्या’, ‘देवघर’, ‘प्रेम संयोग’, ‘हिरक वलय’, ‘शंकांक’ या त्यांच्या काही महत्त्वाच्या कादंबऱ्या. ‘द्राक्षांचे घोस’ हा त्यांचा एकमेव कथासंग्रह असला तरी त्यांच्या कथांची संख्या ७००हून अधिक आहे. **१८८७:-** कथा-कादंबरीकार, समीक्षक, संपादक श्रीपाद महादेव वर्दे यांचे निधन. ‘प्रथम प्रवेश’, ‘पत्ता लागला’, ‘कलंक रहस्य’, ‘सोनेरी पिंजरा’ या कादंबऱ्यांसह ‘मराठी कवितेचा उष:काल’ हा ग्रंथ त्यांनी लिहिला. शाहिरी वाङ्:मयाचा नि:पक्षपातीपणे चिकित्सकतेने वेध या ग्रंथातून घेतला. ‘वीणा’ या साहित्य संघाच्या मुखपत्राचे ते संपादक होते. ‘प्रथम प्रवेश’ ही ऐतिहासिक स्वरुपाची कादंबरी तर पत्ता लागला ही कादंबरी एका वेश्येच्या सुशिक्षित मुलीची शोकांतिका आहे तर ‘सोनेरी पिंजरा’ मधून हिंदी संस्थानिकांचे जीवन रेखाटले आहे. ‘मराठी शाहीर’ हा त्यांचा ग्रंथ म्हणजे त्यांनी मराठी शाहीरी वाङ्:मयाचा सातत्याने, नि:पक्षपातीपणाने व चिकित्सक रसिकतेत घेतलेला वेध होय. **१८९८:-** मार्क्सवादी लेखक व पत्रकार लालजी मोरेश्वर पेंडसे यांचा जन्म. ‘नवमतावाद’, ‘साहित्य आणि समाजजीवन’, ‘धर्म की क्रांती’, ‘गुन्हेगार’ ही त्यांची काही नावाजली गेलेली पुस्तके. तथापि, ‘महाराष्ट्राचे महामंथन’ या त्यांच्या पुस्तकातून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा आरंभापासून ते संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीपर्यंतचा धांडोळा घेतला. लेखक स्वत: चळवळीत सक्रिय असल्याने विशेष महव आहे. **१९१८:-** लेखक प्रथमोपचाराचे एक तज्ञ डॉ. मधुकर पांडुरंग बवळे यांचा जन्म. ‘अपघात... अवधान’ या पुस्तकाचे ते सहलेखक. **१९४४:-** लेखिका प्रज्ञा मधुकर आपटे यांचा जन्म. यांनी ‘उतरली अंतरी तेजाचे कण’ या ललित लेखनासह ‘प्रतिमा इंगोले यांचे ‘कथाविश्व’,‘अक्षरवेल’, ‘पु.ल.देशपांडे यांचे कादंबरी विश्व’ समीक्षात्मक लेखन केले. याशिवाय प्रज्ञा आपटे यांनी प्रौढ शिक्षणासाठी निबंधसंग्रह ‘अमृतकण कोवळे’ हे हरिपाठावरील निवडक अभंग आणि सामाजिक, साहित्यिक ‘संत साहित्य’ आदींवर भाषणे तसेच अनेक शोधनिबंधाचे वाचन करुन मराठी साहित्य समृध्द केले. **१९५०:-** कथा-कांदबरीकार, समीक्षक, संपादक श्रीपाद महादेव वर्दे यांचे निधन. ‘प्रथम प्रवेश’, ‘पत्ता लागला’, ‘कलंक रहस्य’, ‘सोनेरी पिंजरा’, ‘देशसेविकेचे रहस्य’ या कादंबऱ्या लिहिल्या. ‘मराठी कवितेचा उष:काल’ हा ग्रंथ त्यांनी लिहिला. शाहिरी वाङ्:मयाचा नि:पक्षपातीपणा चिकित्सकतेने वेध या ग्रंथातून त्यांनी लिहिला. ‘वीणा’ या साहित्य संघाच्या मुखपत्राचे ते संपादक होते. **१९५७:-** मराठी-हिंदीतून काव्यलेखन करणारे चंद्रकांत नागेश झुंजे यांचा जन्म. ‘अमृतघाट’, ‘संमेलनातील कविता’, ‘धुंद’, ‘सूर्य झेलताना’ आदी काव्यसंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. **१९५८:-** नट आणि नाट्यलेखक म्हणून मराठी साहित्यात आपला ठसा उमटविणारे नागेश रामचंद्र जोशी यांचे निधन. ‘देवमाणूस’ हे त्यांनी लिहिलेल्या नाटकाला छोट्या गंधर्वांनी दिलेल्या चाली आणि हंसराज कोरडे यांनी उभा केलेला कुटूंबासाठी सर्वस्वाचा त्याग करणारा दुर्देवी दादा यामुळे हे नाटक अतिशय गाजले. नागेश यांची ‘संगीत फुलपाखरे’, ‘संगीत मैलाचा दगड’, ‘संगीत विजा’ ही नाटकेही रंगभूमीवर आली. यातील संगीत विजय हे नाटक कामगारांचा संप, मजुरांची एकजूट असा काहीसा त्या काळात वेगळा विषय असल्याने या नाटकालाही प्रेक्षकांची दाद मिळाली. ‘अंतरपाट’ हे नाटकही जोश्यांच्या नावावर आहे. त्या काळात इब्सेनचाफ प्रभाव मराठी रंगभूमीवर होता. तो जोश्यांच्या नाटकावरही जाणवतो. परंतु स्वगते आणि संगीत टाळ्या या नाटकांनी लोकप्रियतेशी तडजोड केली. **१९६६:-** साहित्यिक मिलिंद जोगळेकर उर्फ स्वामी सहजानंद यांचा जन्म. आतापर्यंत २९ पुस्तके प्रकाशित. त्यातील ११ पुस्तके कथा, कविता, लघुकादंबरी, एकांकिका, मुलांसाठी निबंध, भाषणे, व्यक्तिचित्रे, ललित लेख, विनोदी लेख, जीवन कौशल्य आणि अध्यात्मिक अशा स्वरुपाची असून ११ पुस्तके ही एकाच वेळी प्रकाशित झाली होती. **१९७१:-** संपादक मधुसूदन रामकृष्ण उपासनी यांचे निधन. मध्य प्रदेशा तील इंदूरमध्ये वास्तव्य करुन मराठी साहित्याची सेवा त्यांनी केली. ‘मंदार’ मासिकाचे संपादन त्यांनी केले. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शारदातून त्यांनी स्फूट लेखन केले. **१९७२:-** नाट्यसमीक्षक, विनोदी लेखक आणि शिल्पकार रघुनाथ कृष्ण फडके यांचे निधन. ‘नाट्यपरामर्श’ या पुस्तकांत त्यांनी मराठी रंगभूमीचा आढावा घेतला आहे. ‘स्वल्पविराम’ हा त्यांचा विनोदी लेखांचा संग्रह. तसेच ‘रत्नाकर’ मासिकांतून त्यांच्या काही कविताही प्रसिध्द झाल्या. **१९९९:-** संवेदनशील मनाचे साहित्यिक रमेश अच्युत तेंडुलकर यांचे निधन. काही काळ पोलिस खात्यातील सी.आय.डी विभागात कार्यरत. ‘सत्यकथा’ मासिकातून काव्यलेखन. ‘गीतभात’ या त्यांच्या काव्यसमीक्षेला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार. तेंडुलकरांनी मराठी साहित्याला विशेष असे काही दिले असेल तर ते म्हणजे त्यांनी लिहिलेल्या समीक्षा. त्यामध्ये माडगुळकरांच्या गीतरामायणाचे त्यांनी केलेले रसग्रहण, तसेच ‘काव्यसरीता’ या पुस्तकातून त्यांनी मराठी कवितेच्या विकासाचा आलेख रेखाटला. ‘मृण्मयी’ या इंदिरा संतांच्या निवडक कवितांचे रसग्रहण मराठी साहित्याच्या मुकुटात हिऱ्यासारखे चकाकत आहे. तथापि, तेंडुलकर मराठी काव्यरसिकांच्या हृदयात कायमचे आठवणीत राहिले ते त्यांनी आठवणीतील कवितांचे केलेल्या संपादनामुळे. जगप्रसिध्द क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचे ते वडील.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# वीज समस्या सोडवण्यासाठी अर्जंट कॉलची सुविधा

**। मुरूड । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यात महावितरणचे २६ हजारपेक्षा जास्त वीज ग्राहक आहेत. वीज समस्या तातडीने सोडवता याव्यात. यासाठी मुरूड महावितरणकडून अर्जंट कॉल सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे.

समस्या रजिस्टरमध्ये नोंदवली तरी ती समस्या सोडवण्यास वेळ जात होता. शिवाय वीज ग्राहकास खूप दूरवरून महावितरण कार्यालय गाठणे हे सुधा खर्चिक बाब होत होती. याचा अभ्यास केल्यानंतर आता महावितरणने वीज ग्राहकांसाठी अर्जंट कॉल सुविधा प्रणाली आणली आहे. याबाबत महावितरणमार्फत लोकांना निवेदन करण्यात आले आहे की, ग्राहकांनी आपल्या ग्राहक तक्रारीसाठी भमणध्वनी क्रमांक ९०२९१६५९९१ देण्यात आला आहे. ग्राहकांनी सदर नंबरवरती संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. मरूड महावितरणचे उपमुख्यकार्यकारी अभियंता कृष्णात सुर्यवंशी यांनी सांगितले की, ग्राहकाची समस्या तातडीने सोडवण्यासाठी आम्ही हा नंबर दिला आहे.सदरच्या नंबरवर कॉल करताच समस्या ऐकल्यावर तातडीने ती समस्या सोडवण्यात येणार आहे. आमचा ग्राहकाला सर्वोत्तम सेवा देण्याचा प्रयत्न असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ मे

१) श्री. दत्ताराम बाळू नाईक पंतनगर- अलिबाग, १८-५-१९४४

२)श्री.सुनिल गजानन पाटील श्रीबाग-अलिबाग १८-५-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



कै. यशोदा लक्ष्मण तळेकर, स्मरणार्थ, नांदगाव, मुरुड



स्व. श्री. भगवानदास शाम जी शाह, २६ वा स्मृतिदिन, बाजार पेठ अलिबाग

विमल सॉ मिल, उचेडे, पेण

---

**महाराष्ट्र शासन**
**सहकार विभाग**

सहायक निबंधक सहकारी संस्था अलिबाग कार्यालय :
ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत, पहीला मजला, ब्राह्मण आळी, पो.ता. अलिबाग
जि. रायगड. पिन कोड ४०२२०१
Email ID : arcsalibag@gmail.com

सहायक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे समोर,
जा क्र. ९८
अर्ज क्रमांक ०८/२०२४

जनसेवा नागरी सह. पतसंस्था म. अलिबाग — अर्जदार
तर्फे श्रीमती अमृता आशीष पारसनीस व्यवस्थापक
जनसेवा नागरी सह. पतसंस्था म. अलिबाग,

विरूद्ध

१. श्री. धनाजी श्रीरंग मेटकरी
१०१, शिवालय रेसिडेन्सी, विद्यानगर वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड
२. सोनाली धनाजी मेटकरी
१०१, शिवालय रेसिडेन्सी, विद्यानगर वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड
३. श्री. म्हाकाली उमाजी व्हलगुळे
मु.जि.प. शाळेजवळ भाल, पो. थळ, ता. अलिबाग जि. रायगड
४. श्री. सागर दिगंबर महानुर
मु. राजमाळा, पो. थळ ता.अलिबाग, जि. रायगड — प्रतिवादी

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ आणि नियम ८६ अन्वये वसुलीस प्राप्त रक्कम रु ३०,९७,३३५/- साठीचा अर्ज.

ज्या अर्थी जनसेवा नागरी सह. पतसंस्था म. अलिबाग तर्फे श्रीमती अमृता आशीष पारसनीस जनसेवा नागरी सह. पतसंस्था म. अलिबाग, यांनी दिनांक १६/०५/२०२४ रोजी तुमचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्याबाबत रितसर अर्ज या प्राधिकरणासमोर केलेला आहे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ ब च्या तरतुदीस अनुसरुन अर्जाचा निर्णय करावा अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी सदर अर्जामध्ये तुम्हा जाब देणार यांचे विरुद्ध रक्कम ३०,९७,३३५/- (अक्षरी रुपये तीस लाख सत्याणव हजार तीनशे पस्तीस रुपये मात्र) चे वसुली प्रमाणपत्र मिळावे म्हणुन विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी अर्जदार यांनी या अर्जासोबत किरकोळ अर्ज दाखल करुन असे निदर्शनास आणून दिले आहे की, अर्जदार यांनी प्रतिवादी यांना अर्ज दाखल करणेपुर्वी नोटीस दिली होती ती प्रतिवादी क्र. २ यांचे माहीत असलेल्या पत्यावर नोंदणीकृत डाक देय पोहोच पद्धतीने पाठविली होती ती नोटीस प्रतिवादी हे त्या पत्यावरुन निघुन गेले आहेत व त्याचा पत्ता नाही असा शेरा मारुन परत आली आहे. अर्जदार संस्थेच्या दप्तरी त्या व्यतिरिक्त त्याचा दूसरा पत्ता संस्थेला मिळून येत नाही. त्यामुळे अर्जदारातर्फे प्रतिवादीस पहीली नोटीस जाहीर नोटिस देणेची विनंती केली.

त्यानुसार प्रतिवादी यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे नियम ८६ ब (४) नुसार जाहीर नोटीस देणेत येते की, दिनांक ०३/०६/२०२४ रोजी दिवसाचे सकाळी ११.३० वा सहायक निबंधक, सहकारी संस्था अलिबाग यांचे कार्यालय, ब्राह्मण उत्कर्ष मंडळ इमारत,पहीला मजला, ब्राह्मण आळी, पो. ता. अलिबाग जि. रायगड. पिन कोड ४०२२०१ या कार्यालयात तुम्ही स्वतः हजर राहावे व अर्जदार संस्थेने केलेले मागणीबाबत बचाव करण्याची परवानगी घ्यावी किंवा तसा अर्ज शपथपत्र नोटीस जाहीर केलेचे दिवसापासुन १० दिवसाच्या आत या प्राधिकरणासमोर सादर करावे.

या कामी तुम्ही गैरहजर राहीलेस किंवा बचाव करणेचा अर्ज/शपथपत्र मुदतीत दाखल न केलेस, अर्जदाराने अर्जात केलेली अभिकथने आपण स्विकारली आहेत असे गृहीत धरून, अर्जाची चौकशी करुन, अर्ज नियम ८६ क अन्वये एकतर्फी निकालात काढणेत येईल यांची नोंद घ्यावी.

दिनांक:-१६/०५/२०२४

सही/-
**(श्रीकांत पाटील)**
**सहायक निबंधक**
**सहकारी संस्था अलिबाग**

---

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग.
**निविदा सूचना**

आपल्या बँकेच्या विन्हेरे वि.कक्ष शाखा, ता. महाड (नागांव, रेवतळे फाटा मालकीच्या जागेत अंदाजे १५०० चौरस फुट ) च्या पहिल्या मजल्यावर चारही बाजूने विट बांधकाम व सिव्हील स्वरूपाची व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

त्याकरीता सदर स्वरूपाची कामे करणाऱ्या खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २७.०५.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नांवाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक - १८.०५.२०२४ — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**

---

अर्जदाराचे वकील
ॲड. इकरा नासिर शेखानी

**जाहीर नोटीस**
**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.ची.अर्ज.६१/२०२४

गुलझार अहमद इब्राहीम दखनी, — अर्जदार

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदारांचा जन्म दि. १०/०३/१९७६ रोजी गांव शिघ्रे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची जन्म नोंद ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मेरिज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा जन्म दि. १०/०३/१९७६ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा चकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १८/०६/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०५/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग.
**निविदा सूचना -**

आमच्या बँकेची विन्हेरे शाखा, ता. महाड (विन्हेरे ग्रामीण बिगरशेती च्या मालकीच्या अंदाजे १००० चौरस फुट) जागेमध्ये कार्यालयीन कामकाजाकरीता कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

१) सिव्हील वर्क
२)ॲल्युमिनिअम विंडो
३)फर्निचर
४) POP पेंटींग फॉल सिलिंग
५)इलेक्ट्रीकल वर्क
६)नेमबोर्ड
७) इलेक्ट्रीकल फिक्चर
८) प्लंबिंग वर्क
९)वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंन्ट्रोल
१०)पीव्हीसी फ्लोअरींग
११) कलर इनामिल
१२) वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे

त्याकरीता खाजगी कॉन्ट्रॅक्टर /सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेंत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २७.०५.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नांवाने सादर कराव्यांत. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेंत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
दिनांक - १८.०५.२०२४

---

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत, श्री. उदय अनंत पाटील, वगैरे, राहणार नागांव बंदर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झाली आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून सात (०७) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग. | १६६५ | ०-१४-२० <br> ०-००-५० पो.ख. <br> ०-१४-७० एकूण | ०२-३१ |

अलिबाग,
दिनांक १८/०५/२०२४. — सही/
**(ॲड. निवास ना. पाटील)**
श्री क्षेत्र, सहाण,
ता.अलिबाग, जि. रायगड.
खरेदीदाराचे वकील

---

## खोपोली नगरपरिषद

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२ २६३३५६, २६४२११

जा.क्र.केएमसी/नगर रचना/१८० — दिनांक :- १६/०५/२०२४

**खोपोली नगरपरिषद**
**जाहिर प्रकटन**

खोपोली नगरपरिषद हद्दीमधील सर्व रहीवासी मिळकत धारकांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, चालू पावसाळी मौसमामध्ये संभाव्य अतिवृष्टी, वादळ तसेच जमीन खचणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित वा वित्तहानी टाळण्यासाठी ज्या मिळकती/इमारती धोकादायक/धोकादायक कडयांच्या डोंगराच्या, टेकडीच्या बाजुला/ दरड कोसळण्याची शक्यता असणाऱ्या ठिकाणी झाल्या आहेत अथवा काही भाग धोकादायक झाला आहे, अशा इमारती अथवा मिळकतीमध्ये कोणीही वास्तव्य करू नये. तसेच अशा इमारतींच्या किंवा इमारतींच्या मिळकतींच्या संबंधित घरमालकांनी/भोगवटादारांनी आपल्या मिळकतींचा धोकादायक भाग तातडीने उतरवुन धोका नष्ट करावा. अशा धोकादायक इमारती/मिळकती संदर्भात महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये ही नोटीस समजण्यात यावी. अशा धोकादायक इमारतीमध्ये जर कोणी वास्तव्य केले तसेच त्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित व वित्तहानी झाली तर खोपोली नगरपरिषद त्याला जबाबदार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**मुख्याधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**

---

अर्जदाराचे वकील
ॲड. इकरा नासिर शेखानी

**जाहीर नोटीस**
**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि. चौ. अर्ज. ६२/२०२४

गुलझार अहमद इब्राहीम दखनी, ... अर्जदार

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचे वडील इब्राहीम हसन दखनी यांचा मृत्यु दि. २८/११/१९८८ रोजी गांव- शिघ्रे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची मृत्यु नोंद ग्रामसेवक, नोंद ग्रामसेवक, ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यु नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ / मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचे वडीलांचा मृत्यु दि. २८/११/१९८८ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १८/०६/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांचे वडीलांची मृत्यु नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०५/२०१४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

---

अर्जदाराचे वकील
ॲड. एम. जे. तांबडकर

**जाहीर नोटीस**
**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि. चौ. अर्ज. ३१/२०२४

बशीर अहमद इस्माईल पठाण ... अर्जदार

विरुध्द

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे, ...सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांची आई बशिराबीबी महंमद फत्ते यांचा जन्म दि. ०१/०३/१९४० रोजी गांव- शिघ्रे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची जन्म नोंद ग्रुप ग्रामपंचायत शिघ्रे यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १३(३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांची आई बशिराबीबी महंमद फत्ते यांचा जन्म दि. ०१/०३/१९४० रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १८/०६/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांच्या आईची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरूड-जंजिरा**

---

## सार्वजनिक सूचना

**याची नोंद घ्यावी की,** आम्ही **सौ. वंदना बर्जिस देसाई,** यांच्या यातील **पहिल्या अनुसूचीमध्ये पहिल्या** आणि **दुसऱ्या** ठिकाणी अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील जमिनी, एकूण क्षेत्रफळ सुमारे ६३ आर आणि ५४ चौरस मीटर म्हणजेच ६,३५४ चौरस मीटरच्या समतुल्य (एकत्रितपणे, **'जमिनी'**) तसेच यातील **दुसऱ्या अनुसूचीमध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या** ठिकाणी अधिक विशेषरित्या वर्णन केलेल्या सदर जमिनींवर उभ्या असणाऱ्या संरचना (एकत्रितपणे '**संरचना**') (एकत्रितपणे '**मालमत्ता**') यांच्यासंबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत. सदर मालमत्ता **सौ. वंदना बर्जिस देसाई यांनी मेसर्स निक्काई ऋषी लक्झरी होम्स,** भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अंतर्गत नोंदणीकृत असलेली एक भागीदारी संस्था, जिचे कार्यालय : ९, स्टीशा अपार्टमेंट, माउंट मेरी हिल, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०० ०५० **('भागीदारी संस्था')** यांच्यासाठी आणि त्यांच्या वतीने भागीदारी संस्थेचे अधिकृत भागीदार या नात्याने खरेदी केली आहे.

सदर मालमत्तेमध्ये किंवा त्यातील कोणत्याही भागामध्ये / तुकड्यामध्ये आणि / किंवा भागीदारी संस्थेमध्ये आणि / किंवा त्या संबंधातील हक्क विलेखांमध्ये आणि कागदपत्रांमध्ये आणि / किंवा सदर जमिनीच्या त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील चटई क्षेत्र निर्देशांक / तल क्षेत्र गुणोत्तर, हस्तांतरणीय विकास अधिकार आणि त्यातील संभाव्य विकासामध्ये आणि / किंवा सदर मालमत्तेचा किंवा त्यातील कोणत्याही भागाचा ताबा, वापर, भोगवटा आणि उपभोग आणि / किंवा विकास यांच्या संबंधातील विक्री, अभिहस्तांतरण, हस्तांतरण, वाटप, अदलाबदल, बक्षीस किंवा अभिहस्तांकन, गहाण, धारणाधिकार, आकार, न्यास, वक्फ, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेदारी, पोट-भाडेदारी, प्रलंबित वाद, विभाजन, स्थायी धारक अधिकार, मालकी अधिकार, किरकोळ हक्क, संरक्षक भाडेदारी, सर्वसामान्य भाडेदारी, आदिवासी अधिकार, खाजगी वन अधिकार, अनुज्ञप्ती, संरचना मालक अधिकार, त्रयस्थ पक्षकार अधिकार, भोगवटा अधिकार, अधित्याग, अधित्यजन, प्रसंविदा, आरक्षण, संपादन किंवा अधिग्रहण, काळजीवाहू अधिकार, भार, वारसा, मृत्युपत्रीत देणगी, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था / तडजोड, वाद किंवा विवाद, मृत्युपत्र, मृत्युपत्रित अधिकारलेख, मृत्युपत्र प्रमाण, प्रशासनपत्र, सुविधाधिकार, परिरक्षा, विकास अधिकार, संयुक्त विकास, उप-विकास, प्रकल्प व्यवस्थापन, विकास व्यवस्थापन, संयुक्त साहस, सहयोग, भागिदारी किंवा कोणत्याही न्यायालयाचा किंवा अन्य प्राधिकरणांचा कोणताही आदेश किंवा न्यायनिर्णय (अंतरिम किंवा अंतिम) किंवा करार / करारनामा याद्वारे किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणतेही अधिकार, हक्क, हितसंबंध, लाभ, दावा आणि मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना ४०७, युसुफ बिल्डींग, चौथा मजला, वीर नरिमन रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१ येथील पत्त्यावर या जाहिरातीच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत त्यास पाठिंबा देणाऱ्या दस्तावेजी पुराव्याच्या नोटरी केलेल्या प्रमाणित सत्य प्रतींसह लेखी स्वरुपात ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे अशा प्रकारचे तथाकथित अधिकार, हक्क, हितसंबंध, लाभ, दावा किंवा मागणी, जर काही असेल तर, त्यांचा अधित्याग आणि / किंवा परित्याग करण्यात आलेला आहे असे समजण्यात येईल.

### वरील संदर्भित केलेली पहिली अनुसूची :
**(जमिनींचे वर्णन)**

**पहिली :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील गट क्रमांक २६०, हिस्सा क्रमांक २/ए (मौजे आवासचा मूळ गट क्रमांक ९८१, हिस्सा क्रमांक २ अ) च्या ६७ आर जागेपैकी अंदाजे क्षेत्रफळ २९ आर आणि ८४ चौ. मीटर म्हणजेच २,९८४ चौ. मीटर जमिनीचा तो सर्व तुकडा आणि भाग आणि सदर जमीन खालीलप्रमाणे सीमित आहेः
उत्तर दिशेकडे : रस्ता;
दक्षिण दिशेकडे : गट क्रमांक २६१, हिस्सा क्रमांक १ च्या जमिनीचा भाग;
पूर्व दिशेकडे : गट क्रमांक २६०, हिस्सा क्र. २/बी ची जमीन; आणि,
पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक २६०, हिस्सा क्रमांक १ ची जमीन.

**दुसरी :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील गट क्रमांक २६१, हिस्सा क्रमांक १/१ (मौजे आवासचा मूळ गट क्रमांक ९८२, हिस्सा क्रमांक १), अंदाजे क्षेत्रफळ ३३ आर आणि ७७ चौ. मीटर म्हणजेच ३,३७० चौ. मीटर जमिनीचा तो सर्व तुकडा आणि भाग आणि सदर जमीन खालीलप्रमाणे सीमित आहेः
उत्तर दिशेकडे : गट क्रमांक २६०, हिस्सा क्रमांक १ आणि गट क्रमांक २६०, हिस्सा क्रमांक २अ च्या जमिनी;
दक्षिण दिशेकडे : गट क्रमांक २६१, हिस्सा क्रमांक २ ची जमीन;
पूर्व दिशेकडे : गट क्रमांक २६१, हिस्सा क्रमांक २ ची जमीन; आणि,
पश्चिम दिशेकडे : गट क्रमांक ९५९ (जुना) ची जमीन.

### वरील संदर्भित केलेली दुसरी अनुसूची :
**(संरचनांचे वर्णन)**

**पहिली :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनींवर उभ्या असणाऱ्या मालमत्ता क्र. १८२२ च्या घराचा तो सर्व तुकडा किंवा भाग, क्षेत्रफळ सुमारे ९७७.१० चौ. मीटर .

**दुसरी :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनींवर उभ्या असणाऱ्या मालमत्ता क्रमांक १८२४च्या घराचा तो सर्व तुकडा किंवा भाग, क्षेत्रफळ सुमारे ५६.९० चौ. मीटर.

**तिसरी :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनींवर उभ्या असणाऱ्या मालमत्ता क्रमांक १८२५च्या घराचा तो सर्व तुकडा किंवा भाग, क्षेत्रफळ सुमारे २५.२० चौ. मीटर.

**चौथी :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनींवर उभ्या असणाऱ्या मालमत्ता क्र. १८२६ च्या घराचा तो सर्व तुकडा किंवा भाग, क्षेत्रफळ सुमारे १६ चौ. मीटर.

**पाचवी :**
गाव टेकळी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील आणि उप-निबंधक अलिबाग (रायगड) यांच्या क्षेत्रातील पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनींवर उभ्या असणाऱ्या मालमत्ता क्र. १८२३ च्या घराचा तो सर्व तुकडा किंवा भाग, क्षेत्रफळ सुमारे २४३.३० चौ. मीटर.

मुंबई, दिनांक १८ मे, २०२४.

**मेसर्स एम. टी. मिस्किटा ॲण्ड कंपनी**
ॲडव्होकेट्स आणि सॉलिसिटर्स

---

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

---

अर्जदाराचे वकील
ॲड.एम.एम.तांबडकर

**जाहीर नोटीस**
**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.ची.अर्ज. ७१/२०२४

स्वप्नाली रामचंद्र बरंबे, — अर्जदार

विरुध्द

निबंधक
जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मिठेखार, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचा जन्म दि. ३०/०६/१९९८ रोजी गांव- आमली, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असुन त्यांची जन्म नोंद ही निबंधक जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत मिठेखार, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा जन्म दि. ३०/०६/१९९८ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. १८/०६/२०२४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १७/०५७ २०२४ रोज माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

श्री. सुभाष शिवराम गिजम, श्री. मदन शिवराम गिजम, श्रीमती. निता परशुराम वारिक, श्रीमती. लक्ष्मी शिवराम गिजम, श्रीमती. विजया विलास गिजम, श्री. विशाल विलास गिजम, श्री. अक्षय विलास गिजम, श्रीमती. सोनल राकेश तोडणकर यांचे नावे मौजे वेश्वी, ता. अलिबाग येथे वेश्वी ग्रामपंचायत हद्दीमध्ये खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वेश्वी, ता.अलिबाग, जि. रायगड येथील**

| भुमापन कमांक व उपविभाग | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| ७५ब / २ | बिनशेती २.००.०० | २०.०० |

या मिळकतीमध्ये असलेले ग्रामपंचायत वेश्वी हद्दीतील मालमत्ता कं. २३६/अ व २३६ / ब या घरांसह

सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचे मालक सांगत आहेत. तरी वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यासंबंधीच्या लेखी हरकती असल्यास खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क/हितसंबंध नाहीत असे गृहित धरुन आमचे अशिलांना मिळकतीवर विद्यमान मालकांचे हक्क निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, व त्यानुसार आमचे अशिल यापुढील व्यवहार करतील. हे सर्वास जाहीर व्हावे,

अलिबाग — सही/-
दिनांक: — **ॲड. दिपा दिलिप जोग**
ब्राम्हण आळी,
अलिबाग- रायगड
मो.नं.-७७७५८०२५०३

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे तिवणे, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. रमेश शांताराम कदम | ९ | २ | ०-०९-६० <br> पो.ख.०-०६-३० <br> ०-१२-९० | ०-४८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

कर्जत

तारीख : १७/०५/२०२४ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मोबाईल: ९८२२९११२०५ — **श्री. ओ. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की, खाली नमूद केलेल्या जमिन मालकांने त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खाली वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे पक्षकार यांना विकत देण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे हुमगाव, ता. कर्जत, जि. रायगड जमिन मिळकत**

| जमीन मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री. रवि सारंगन <br> श्री. संजय श्रीनिवासन | ४३ | १ | ०-०७-४० <br> पो. ख. ०-०२-०० <br> ०-०९-४० | ०-११ |
| | ४४ | १ | ०-४८-६० <br> पो. ख. ०-०४-७० <br> ०-५३-३० | ०-९८ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिएन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्कहितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

तारीख : १५/०५/२०२४ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
मोबाईल: ९८२२९११२०५ — **श्री. ओ. पी. डिमेलो**
मु. भिसेगाव, ता. कर्जत, जि. रायगड

निवडक

### चार वाहनांचा अपघात

**उरण :** उरण- पनवेल मार्गावरील रेल्वे स्थानकानजीक एका चारचाकीसह, रिक्षा आणि दोन दुचाकी आशा चार वाहनांचा एकत्रित अपघात झाला आहे. यामध्ये चार जण जखमी आहेत. या अपघातात दोन दुचाकी, क्रेटा चारचाकी वाहन व रिक्षाचे नुकसान झाले आहे. यातील रिक्षा अपघात होताच पलटी होऊन रस्त्याखाली कोसळली. अपघात नंतर जखमींना नागरिकांनी रुग्णालयात हलविले आहे. अपघात कसा झाला याची माहिती समोर आलेली नाही.

### बेकायदा फलक उतरवणार

**पनवेल :** बेकायदा फलकांचे तोडकाम पनवेल महापालिका प्रशासन दोन दिवसांत हाती घेणार आहे, अशी माहिती पनवेल महापालिकेच्या बांधकाम नियंत्रण पथकाचे प्रमुखांनी दिली. पनवेल हद्दीत शेकडो फलक पालिकेतील विविध रस्त्यांशेजारी आहेत. मात्र यामधील पालिकेच्या परवाना विभागाकडून रितसर परवानगी घेऊन फलक उभारले आहेत. या व्यतिरिक्त पालिकेची परवानगी न घेता उभारलेल्या फलकांचे सर्वेक्षण करण्याचे आदेश पालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

### पावसाने उडाली तारांबळ

**खांब :** कोलाड नाक्यावर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नाक्यावर तारांबळ उडाली. पाणी तुंबल्याने पाण्यातून वाटसरूंना मार्गक्रमण करताना थोडीशी कसरतही करावी लागली. दुपारी तीनच्या सुमारास वातावरणात एकाकी बदल होऊन आकाशात काळे ढग जमा झाले.त्यातच सोसाट्याचे वारे सुटून बघता बघता पावसाने हजेरी लावली. सुमारे एक तास हा पाऊस पडत राहिल्याने रस्त्यावर दुकान मांडून बसलेल्या छोट्या व्यवसायिकांची तारांबळ उडाली.

### गुरांचा चारा हिरावला

**खांब :** दोन दिवस कोसळलेल्या अवकाळी पावसाने गुरांचा चारा मात्र हिरावून घेतला आहे. रोहा तालुक्यातील खांब विभागातील शेतकरी उन्हाळी हंगामात भात पिकाची लागवड करतात. परंतु, शेती क्षेत्रावर विविध प्रकारच्या संकटांची मालिका सुरू असल्याने शेतकरी वर्गाने शेतीकडे पाठ फिरवली आहे. अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने भातशेतीचे मोठे नुकसान झालेले पहावयास मिळाले.पेंढा पावसाने भिजल्याने गुरांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

### कुंभार व्यवसायावर संकट

**म्हसळा :** अवकाळी पावसामुळे कुंभार समाज व्यापारी, आंबा बागायतदार आणि विटभट्टीचे व्यापारी यांच्या व्यवसायावर प्रचंड प्रमाणात नुकसानीचे सावट पसरले आहे. कुंभार समाज व्यवसायिकांचा तयार केलेला कच्चा माल आणि वीट भट्टीवाल्यांच्या तयार असलेल्या वीटा या पूर्णपणे भिजून मातीचे गोळे तयार झाल्याने त्यांची पूर्ण मेहनत वाया गेली आहे. बागायतदार आणि कुंभार व्यावसायिक तसेच विटभट्टी मालक नुकसान भरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.

# माथेरानला नेरळमधून पाणीपुरवठा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**वादळी वारा आणि अवकाळी पाऊस यामुळे सर्वत्र विजेचे खांब कोसळले आहेत. माथेरानला पाणी पुरवठा करणाऱ्या उल्हास नदी येथील पंप हाऊस वीज पुरवठा खंडित झाल्याने तीन दिवस बंद आहे. माथेरान पंप हाऊसच्या बाजूला नेरळ ग्रामपंचायतीच्या नळपाणी योजनेचा पंप हाऊस आहे. नेरळ ग्रामपंचायतीने तब्बल तीन दिवस जनरेटरचा वापर करून ग्रामस्थांना पाणी पुरवठा केला आहे, तर माथेरान नळपाणी योजनेकडे अशी व्यवस्था नसल्याने आज तीन दिवसांनी माथेरानसाठी पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.**

दरम्यान, महावितरणचे कार्यकारी अभियंता लटपटे यांच्या उपस्थितीत विशेष बाब म्हणून अतिरिक्त वीज पुरवठा माथेरान आणि नेरळ नळपाणी योजनांसाठी उपलब्ध करून दिल्याने पंप हाऊस येथे वीज पोहचली आहे.

कर्जत तालुक्यात वादळी वाऱ्याने मोठे नुकसान केले आहे.अवकाळी सोबत आलेल्या वादळी वाऱ्याने २५० विजेचे खांब कोसळले आहेत. १५मे रोजी जिते नेवाली परिसरात वादळ आले होते. त्यावेळी कोसळलेले विजेचे खांब पूर्ववत करण्याची कामे महावितरणकडून सुरू होती. त्यावेळी दुपारी कोणत्याही क्षणी वीजपुरवठा पूर्ववत होईल अशी स्थिती असताना वादळ आले आणि महावितरणकडून दोन दिवस प्रचंड मेहनतीने उभारलेले विजेचे खांब पुन्हा कोसळले.



नेरळ आणि माथेरान नळपाणी योजना यांचे पंप हाऊस असलेल्या उल्हास नदीवरील पंप हाऊस येथे असलेले विशेष फिडर हे काम करीत नव्हते. शुक्रवारी सकाळी महावितरणचे कार्यकारी अभियंता लटपटे हे पेण येथून नेरळ येथे आले.

नेरळ कुंभे येथे कार्यकारी अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली नळपाणी योजना अवलंबून असलेल्या कुंभे पंप हाऊस येथे विशेष फिडरद्वारे वीज पुरवठा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू केले गेले.

उप अभियंता प्रकाश देवके, सहायक उप अभियंता प्रशांत मोडक यांनी त्यानुसार कार्यवाही करीत दुपारी बारापूर्वी माथेरान आणि नेरळ नळपाणी योजना असलेल्या ठिकाणी वीज पुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे माथेरानसाठी तब्बल तीन दिवसांनी नेरळ कुंभे येथून पाणी पुरवठा सुरू झाला आहे.

त्यामुळे आज सुरू झालेला पाणी पुरवठा लक्षात घेता माथेरानमध्ये पूर्ण क्षमतेने पाणी पोहचण्यास आणखी काही तास लागणार आहेत. कारण माथेरानमध्ये देखील वीज नसल्याने अखंडित वीज पुरवठा नसल्याने पाणी पूर्ण क्षमतेने माथेरान येथील जलशुध्दीकरण केंद्रावर पोहचण्यास अवधी लागणार आहे. मात्र माथेरान येथे असलेले पर्यटन स्थळ आणि तेथे उन्हाळ्यात होणारी गर्दी लक्षात घेवून आवश्यक असलेली वीज खंडित होणार नाही याची काळजी महावितरण घेत आहे अशी माहिती उप अभियंता प्रकाश देवके यांनी दिली.

### ग्रामपंचायतीकडून दररोज ६० हजाराचे डिझेल

**उल्हास नदीवरील कुंभे येथे तीन दिवस वीज पूर्णपणे बंद आहे. त्यामुळे नेरळ ग्रामस्थांवर पाणी टंचाईचे संकट येणार नाही. यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने जनरेटरचा वापर करून पाणी पुरवठा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १४मे पासून नेरळ ग्रामपंचायत दररोज ५५-६० हजाराचे डिझेल खरेदी करून जनरेटरचे सहाय्यक नेरळ गावांसाठी अखंडित पाणी पुरवठा करीत आहे. त्यामुळे नेरळ गावात वीज नाही आणि तरी देखील पाणी ग्रामस्थांना मिळत आहे, असे नियोजन नेरळ ग्रामपंचायतीने केले. माथेरान आणि नेरळ नळपाणी योजना यांचे पंपहाऊस हे बाजू बाजूला असतानादेखील पंपहाऊस परिसरात वीज नसताना नेरळ ग्रामपंचायतीचे नळपाणी योजना कार्यरत असल्याचे कौतुक होत आहे. सर्वांना वेळेवर पाणी मिळावे, यासाठी नेरळ ग्रामपंचायत दररोज डिझेल खरेदी करण्यासाठी रोख पैसे आमच्याकडे नसतात. तरी देखील आम्हाला ग्रामस्थांसाठी ती व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी अरुण कार्ले यांनी दिली आहे.**

# हॉटेलधारकांना पाणी मस्त; नागरिक पाण्याविना त्रस्त

**। माथेरान । वार्ताहर ।**

मागील तीन दिवसांपासून माथेरानमध्ये वीज आणि पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत असल्याने ऐन सुट्ट्यांचा हंगाम असताना याचा पर्यटनावर विपरीत परिणाम झालेला आहे. त्यातच ई रिक्षांना चार्जिंग नसल्याने ही सेवा सुध्दा कोलमडून गेली होती. शालेय विद्यार्थ्यांना सुध्दा दूरवर शाळेत जाताना तारेवरची कसरत करावी लागली आहे.

शारलोट लेक येथे जनरेटर असताना देखील त्याचा वापर न केल्यामुळे पाणी पुरवठा केला गेला नाही. तर संध्याकाळच्या दरम्यान तीन दिवस सतत वादळी वारा आणि पाऊस यामुळे नेटवर्किंग सेवा उपलब्ध होऊ शकली नाही. काही ठिकाणी वादळी वाऱ्याने झाडे उन्मळून पडली आणि सततच्या विजेच्या लपंडावामुळे उष्मा अधिक जाणवत होता.

विशेष म्हणजे येथील

### वीज, पाणी गायब; पर्यटनावर परिणाम

हॉटेलधारकांना मुबलक पाणी पुरवठा केला जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे हॉटेलधारक कधीच स्थानिकांनी उभारलेल्या आंदोलनात अथवा ग्रामस्थांशी हितसंबंध ठेवत नाहीत. मुळात त्यांची अनधिकृत वाढीव बांधकामे असल्याने हॉटेलधारक शासनाच्या विरोधात भूमिका घेत नाहीत.

त्यांना मुबलक पाणीपुरवठा केला जातो आणि गावातील नागरिकांना पाण्यावाचून दिवस काढावे लागतात हा जरी संशोधनाचा विषय असला तरी जे माजी लोकप्रतिनिधी आहेत त्यांनी आवाज उठवणे गरजेचे आहे पण पदाशिवाय इथली नेतेमंडळी पुढाकार घेत नाहीत हे दुर्भाग्यच म्हणावे लागेल असे स्थानिक बोलत आहेत.

# क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे काम प्रगतीपथावर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच पालिका नवीन पनवेल येथे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारत असून या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून जून अखेरीस हे बांधकाम पूर्ण होणार आहे. नुकतेच पालिका आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी प्रशिक्षण केंद्राची पाहणी करुन कामाचा आढावा घेतला.

पनवेल महापालिकेच्या सदस्यांनी सभागृहात ठराव करुन सिडको महामंडळाकडून क्रिकेट प्रशिक्षणासाठी नवीन पनवेल येथील आदई सर्कलशेजारचा २८ हजार चौरस मीटरचा भव्य भूखंड मिळविला. या भव्य भूखंडावर क्रीडांगणाचे आरक्षण असल्याने



पालिकेने येथे क्रिकेट प्रशिक्षणासाठी भव्य मैदान बांधले आहे. तब्बल १२ कोटी रुपये पालिका या प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठी खर्च करत आहे. पुढील नऊ वर्षे दिलीप वेंगसरकर यांच्या प्रशिक्षण संस्थेला हे प्रशिक्षण केंद्र पालिका देखभाल व प्रशिक्षणासाठी देण्याचे पालिका सदस्यांनी ठरविले आहे.

वेंगसरकर यांची प्रशिक्षण संस्था वर्षात शंभर प्रशिणार्थींना या मैदानात क्रिकेटचे धडे देणार आहे. शंभर प्रशिक्षणार्थी निवडताना पनवेल पालिका क्षेत्रातील ५० तसेच रायगड जिल्ह्यातील २५ व राज्यातील २५ या निकषावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाणार आहे. जुलै महिन्यात दिलीप वेंगसरकर प्रशिक्षण संस्थेकडे हे मैदान हस्तांतरण झाल्यानंतर यंदाच्या दिवाळीपासून या मैदानातून क्रिकेटच्या प्रशिक्षणाला सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे. वेंगसरकर यांची संस्था या मैदानाच्या देखभालीचा खर्च विविध कंपन्यांच्या सीएसआर निधीतून करणार आहे. तसेच या मैदानामध्ये विविध क्रिकेट सामन्यांच्या मालिका आयोजित करुन त्यामधून मिळणाऱ्या नफ्यातून या प्रशिक्षण केंद्राची देखभाल वेंगसरकर यांच्या संस्थेला करावी लागणार आहे.

### मुलींच्या वसतिगृहात मोफत प्रवेश

**पनवेल :** सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, हे सेक्टर १०, प्लॉट नं.२१ ग्रीन पार्क सोसायटी समोर पनवेल येथे कार्यरत आहे. या वसतिगृहामध्ये इयत्ता ८ ची पासून गरीब, हुशार, मागासवर्गीय अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास, अनाथ व अपंग यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात विनामूल्य उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# नदीतील जलप्रदूषण माशांच्या जीवावर

**। सुकेळी । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या हेदवली व अंबा नदीच्या पाण्यामध्ये मृत मासे पाण्यावरती तरंगत असल्याचे येथील स्थानिक ग्रामस्थांच्या निदर्शनास आले.

मासे मृत होण्याचे नक्की कारण अद्यापही समजले नाही. यामागे एखादा केमिकल घेऊन जाणारा टँकर धुतल्यामुळे किंवा औद्योगिक सांडपाणी सोडल्यामुळे हे मासे मृत झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

हेदवली येथील नदीवर हेदवली, ऐनघर, कानसई तसेच काही आदिवासी वाड्यांवरील नागरिक या पाण्याचा वापर



आंघोळी, कपडे आणि गुरांना पाणी पिण्यासाठी तसेच विविध कामांसाठी करत असतात. याआधीच हेदवली गावामध्ये अनेक महिन्यांपासून पाण्याची टंचाई असताना या नदीच्या पाण्यामध्ये मोठ्या प्रमाणात मृत मासे पाण्यावरती तरंगल्यामुळे संपूर्ण पाणी दुषित झाले आहे.

हेदवली नदीचे पाणी हे वाकण येथील अंबा नदीला जाऊन मिळत असल्यामुळे हे सर्व मृत मासे पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत अंबा नदीमध्ये आल्यामुळे सर्वत्र मृत माशांचा खच दिसत आहे.

या प्रदुषित झालेल्या पाण्यामुळे वाकण, पाटणसई, बाळसई, गोडसई, वजरोली आदी गावांतील नागरिकांना प्रदुषित झालेल्या पाण्यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नदीवर कपडे धुण्यासाठी गेलेल्या महिलांना तर मृत माशांच्या वासामुळे उलटी, डोकेदुखी असे आजार उद्भवले आहेत. मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

त्यामुळे या विभागातील नागरिकांपुढे सद्यपरिस्थितीत नदीच्या पाण्याचा वापर करावा की नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे. दरम्यान यासंबंधीत प्रशासनाने पाण्याचे तसेच मृत माशांचे नमुने तपासणीसाठी घेऊन नक्की काय कारण आहे हे शोधून याबाबतीत योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

# फलक हटवण्याचे काँग्रेसने दिले निवेदन

। पनवेल । प्रतिनिधी।

मुंबईमध्ये वादळी पावसामुळे जे काही वित्तीय आणि मनुष्यहानी झाली आहे वेगवेगळ्या ठिकाणी पडलेले होल्डिंग असतील किंवा इमारती मटेरियल असेल त्यामुळे सामान्य नागरिकांना आपले प्राण आणि वित्तीय नुकसान भोगावे लागलेले आहे याच अनुषंगाने पनवेल महापालिकेला महिला काँग्रेसच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.

पनवेलमध्ये तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक खरेदीसाठी येतात. त्याच अनुषंगाने आपल्या उद्योगाचा किंवा आपल्या उत्पादनांचा मोठ्या प्रमाणात जाहिरातीद्वारे लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचं एक माध्यम म्हणून होर्डिंग लावली जातात. महापालिकेच्या क्षेत्रात होल्डिंग हे जाहिराती फलक लावण्यासाठी भाडेतत्त्वावरती देण्यात येतात. याच अनुषंगाने भविष्यात कोणत्याही प्रकारे नागरिकांचे नुकसान अथवा इजा होऊ नये. म्हणून महापालिका प्रशासनाने संबंधित जाहिराती फलकांसाठी नियम तयार करून तसेच जो कोणी ठेकेदार असेल त्याला होल्डिंगच्या देखभाल संदर्भात सक्त सूचना देण्यात यावी असे निवेदन पनवेल महिला काँग्रेस तर्फे देण्यात आले.

# लेखी स्पर्धेत सचिन केदारे अव्वल

### स्पर्धेत १०० स्पर्धकांचा सहभाग

**। वावोशी। वार्ताहर ।**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त सुधागडमधील ढोकशेत येथील समता मित्र मंडळ व सावित्रीबाई फुले महिला मंडळ यांनी जग बदलणारा बापमाणूस या जगदीश ओहोळ यांच्या लिखित पुस्तकावर आधारित घेण्यात आलेल्या भव्य लेखी स्पर्धेमध्ये आपल्या अभ्यासू शैलीने सचिन केदारे यांनी प्रथम क्रमांक पटकावत दहा हजारांचे रोख पारितोषिक मिळवले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त १२ मे रोजी सुधागड मधील ढोकशेत येथील समता मित्र मंडळ व सावित्रीबाई फुले महिला मंडळ यांनी जग बदलणारा बापमाणूस या





जगदीश ओहोळ यांच्या पुस्तकावर आधारित घेण्यात आलेल्या भव्य लेखी स्पर्धेमध्ये सचिन केदारे यांनी सहभागघेतलाहोता.सदरीलपरीक्षेचे आयोजन सुधागड तालुक्यातील परळी येथील डॉ. प्रभाकर गावंड हायस्कूल येथे सर्व जाती धर्मातील व सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी करण्यात आले होते. एकूण ५० गुण असलेल्या या लेखी परीक्षेचे स्वरूप पर्यायी प्रश्न पद्धतीचे होते आणि या परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या स्पर्धकाला १० हजार, द्वितीय क्रमांक ७ हजार तर तृतीय क्रमांक ५ हजार असे उत्तेजनार्थ पारितोषिक ढोकशेत येथील समता मित्र मंडळ व सावित्रीबाई फुले महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ठेवण्यात आले होते. या लेखी परीक्षेलाजिल्ह्यातून एकूण १०० स्पर्धक बसले होते. या १०० स्पर्धकामधून सचिन केदारे यांनी प्रथम क्रमांक मिळवून आपल्या ज्ञानाची चमक या स्पर्धेतून दाखवली आहे. त्यामुळे त्यांचा ढोकशेत या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव कार्यक्रमात आलेले प्रमुख पाहुणे प्रकाश देसाई यांच्या हस्ते रोख १० हजार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जग बदलणारा बापमाणूस या पुस्तकाचे लेखक जगदीश ओहोळ उपस्थित असल्याने कार्यक्रमाची संकल्पना प्रत्यक्षात साकार होताना दिसत होती.




# उन्हाळी प्रशिक्षण शिबीर

**। पोयनाड । प्रतिनिधी ।**

पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी यांनी रसायनी पाताळगंगा येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सिक्युरिटी मार्केट्सच्या क्रीडांगणावर युवा क्रिकेटपटूंसाठी तीनदिवसीय क्रिकेटचे प्रशिक्षण शिबिर व नंतर दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचे उत्स्फूर्तपणे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये फलंदाजी, गोलंदाजी, यष्टीरक्षण व क्षेत्ररक्षणांचे तंत्रशुद्ध पद्धतीने तज्ञ प्रशिक्षकांच्या मार्फत प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरानंतर दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धेचेदेखील आयोजन करण्यात आले होते. खेळाडूंचे क्रिकेट कौशल्य वाढवून पुढे जिल्हा व राज्यस्तरीय पातळीवर त्यांची निवड व्हावी हे या प्रशिक्षण शिबिराचे मुख्य उद्दिष्ट होते. शिबिरासाठी मुख्य तज्ञ प्रशिक्षक म्हणून सागर कांबळे, अर्षद पेंढारी, सागर मुळे, प्रवीण जगदाळे, विकास पवार, सुशांत पवार यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले.

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- वायशेत येथे मुख्य हमरस्त्यानजीक २ गुंठे प्लॉट वीज, पाणी, वॉलकंपाऊंड, गेट, भराव, शेड व असेसमेंटमधील भाड्याने देणे आहे/विकणे आहे. संपर्क : ७०४५३६६६५२
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- रायवाडी कॉम्प्लेक्स अलिबाग शहरामध्ये असलेल्या स्टार हेल्थ इन्शुरन्स ऑफिसमध्ये स्टाफ आवश्यक आहे. कम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक, शक्यतो पदवीधर असावा. दोन उमेदवार आवश्यक आहेत. स्त्री-पुरूष कोणीही चालतील, अनुभव असेल तर उत्तम. ९८२२९३८४४४ या नंबरवर रिझ्युम सेंड करावा. त्याप्रमाणे आपल्याला संपर्क करण्यात येईल.
- पिंपळभाट, अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये कामासाठी मुले पाहिजेत. शिक्षण- १० ते १२ किमान व अलिबागच्या आजूबाजू परिसरातील हव्यात. ९६२३३६६७७८
- पिंपळभाट अलिबाग येथे मेडिकल एजन्सीजमध्ये सेल्समन म्हणून मुले पाहिजेत. (शिक्षण १० ते १२ किमान) (वय २०-३० पर्यंत) ९६२३३६६७७८
- Shop near Alibag ST Stand is for sale 9764548679

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ...तर रद्द होणार आरटीईअंतर्गत प्रवेश

*। रायगड । प्रतिनिधी ।*

***शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी ३१ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज भरावा लागणार आहे. त्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना शिक्षण विभागाने प्रसिद्ध केल्या आहेत. अर्ज करताना पालकांना दहा शाळांची निवड करावी लागणार असून, एकापेक्षा जास्त अर्ज भरल्याचे आढळल्यास अर्ज सोडतीसाठी विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जात चुकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द केला जाणार आहे.***

### शिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

*आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेबाबतच्या मार्गदर्शक सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्ध केल्या. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आर्थिक दुर्बल, वंचित, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटकांतील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळा, पोलीस कल्याणकारी शाळा (विनाअनुदानित) आणि महानगरपालिका शाळांमध्ये (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) पहिली किंवा पूर्वप्राथमिक या स्तरावर २५ टक्के राखावी जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवली*



*जाणार आहे. आरटीई प्रवेशासाठी या पूर्वी ऑनलाइन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना पुन्हा नव्याने अर्ज करावा लागणार आहे. आधीच्या अर्जाचा २०२४-२५ या वर्षाच्या आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.*

*आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी विचारपूर्वक १० शाळांची निवड करावी.*

*शाळेपासून घरापर्यंतचे हवाई अंतर गुगल मॅपने निश्चित करायचे असल्याने शाळा निवडताना अंतराची बाब लक्षात घेऊन पालकांनी बलूनद्वारे निवासस्थानाचे ठिकाण निश्चित करण्यासाठी तो बलून जास्तीत जास्त पाच वेळाच निश्चित करता येईल. त्यामुळे पालकांनी निवासस्थानाचे स्थान अचूक नमूद करावे. अर्ज भरण्याच्या कालावधीमध्ये इंटरनेट अथवा इतर तांत्रिक अडचणीमुळे परिपूर्ण अर्ज सादर करण्यामध्ये व्यत्यय येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शक्य तितक्या लवकर अर्ज सादर करावा. प्रवेश प्रक्रियेबाबत काही समस्या असल्यास आरटीई संकेतस्थळावर मदत केंद्राची माहिती देण्यात आलेली आहे. मदत केंद्राशी संपर्क साधून समस्येचे निराकरण करावे. आरटीई २५ टक्के अंतर्गत या पूर्वी शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करता येणार नाही. पालकांनी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले. अधिक माहिती https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.*

www.krushival.in | कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# रस घ्या, तंदुरुस्त रहा

वाढत्या उकाड्याने त्रस्त झाला आहात ना मुलांनो... प्रखर सूर्यप्रकाश आणि उष्णतेमुळे शरीरात पाण्याची कमतरता जाणवते. मग शरीराला थंडावा देण्यासाठी आपण कोल्ड ड्रिंक्स, शीतपेये आणि रेफ्रिजरेटरचे पाणी वापरतो. पण अशी पेये आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.



म्हणूनच शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी तुम्ही ताज्या फळांपासून बनवलेल्या रसाचे सेवन करायला हवे. चला तर मग, तुम्ही कोणते ज्यूस सेवन करू शकता हे पाहू.

फन टाईम

**✻ लिचीचा रस**

लिचीमध्ये भरपूर पोषक तत्वे असतात. यामध्ये व्हिटॅमिन, मिनरल्स आणि अँटीऑक्सिडंट्स चांगल्या प्रमाणात असतात. लिची खाल्ल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते, पचनशक्ती मजबूत होते. उन्हाळ्यात लिचीचा रस प्यायल्यास शरीरात पाण्याची कमतरता भासत नाही. याशिवाय त्वचाही चमकदार होईल. म्हणूनच उन्हाळ्यात काही गोड प्यायचे असेल तर तुम्ही या रसाचे सेवन करू शकता.

**✻ आंब्याचा रस**

कडक उन्हात काही रसाळ खायचे असेल तर तुम्ही आंब्याचे सेवन करू शकता. हा रसही उन्हाळ्यात तुमचे शरीर हायड्रेट ठेवेल. यामध्ये पुरेशा प्रमाणात जीवनसत्त्वे आणि खनिजे असल्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता दूर होते. उन्हाळ्यात शरीर ऊर्जावान ठेवण्यासाठी तुम्ही आंब्याच्या रसाचे सेवन करू शकता.

# सप्तरंगी फ्रान्स

सफर देशांची

फ्रान्स हा युरोप खंडातला एक महत्त्वाचा देश. पॅरिस ही फ्रान्सची राजधानी. नुकताच या देशाच्या फुटबॉल संघाने विश्वचषक जिंकला आणि सगळीकडे एकच जल्लोष झाला. फ्रान्स युरोपच्या पश्चिम भागात आहे. फ्रेंच ही या देशाची अधिकृत भाषा. युरो हे इथलं चलन आहे. युरोपातल्या विविध देशांप्रमाणे फ्रान्सला सांस्कृतिक वारसा लाभला आहे. इथे बऱ्याच ऐतिहासिक वास्तू आहेत. पॅरिसमधला आयफेल टॉवर तर जगप्रसिद्ध आहे. फ्रान्समध्ये दरवर्षी ८२ दशलक्ष परदेशी पर्यटक येतात असं एक आकडेवारी सांगते. हा युरोपियन युनियनच्या संस्थापक सदस्यांमधील एक देश आहे. युरोपियन युनियनच्या सदस्य देशांमध्ये फ्रान्सचं क्षेत्रफळ सर्वाधिक आहे. तो संयुक्त राष्ट्रांचाही संस्थापक सदस्य आहे. तसंच जी ८ आणि नाटोचाही सदस्य आहे. या देशाच्या उत्तरेला समुद्र, उत्तर-पश्चिमेला इंग्लिश खाडी, पश्चिमेला अटलांटिक महासागर आणि दक्षिण-पश्चिमेला भूमध्य समुद्र आहे. बेल्जियम, लक्सेंबर्ग, जर्मनी, स्वित्झर्लंड, इटली, मोनॅको, अँडोरा आणि स्पेन हे फ्रान्सचे शेजारी देश आहेत. फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणावर विविध पिकांचं उत्पादन घेतलं जातं. हा जगातला तिसऱ्या क्रमांकाचा कृषी उत्पादन निर्यात करणारा देश आहे. 'टूर डी फ्रान्स' ही इथली जगप्रसिद्ध सायकल स्पर्धा आहे. ही स्पर्धा तब्बल तीन आठवडे चालते. यात स्पर्धक सायकलने ३,५०० किलोमीटर अंतर पार करतात. फ्रेंच ओपन ही महत्त्वाची टेनिस स्पर्धाही या देशामध्ये संपन्न होते.



फ्रान्स हा अतिशय सुंदर देश आहे तसंच युरोपातला सर्वाधिक लोकसंख्या असणारा तिसऱ्या क्रमांकाचा देश आहे. या देशाची लोकसंख्या ६५ दशलक्ष आहे. ऱ्हाईन ही देशामधली सर्वात लांब नदी असून माँट ब्लँक इथला सर्वात उंच पर्वत आहे.

# असे होते क्लाउड सीडिंग

एकीकडे जगातील अनेक देश प्रचंड उष्णतेशी झुंजत आहेत, तर दुसरीकडे संयुक्त अरब अमिराती (दुबई) पूरस्थितीला तोंड देत असल्याचे तुम्ही ऐकले वा वाचले असेल. मित्रांनो, खरे तर दुबईचे लोक ढग पाहण्यासाठीही तळमळत असत. मात्र त्याच देशात पावसामुळे जनता त्रस्त आहे.



अशा मुसळधार पावसाचे एक कारण क्लाउड सीडिंग देखील असू शकते, असे तज्ज्ञ सांगतात. म्हणूनच आज आपण क्लाउड सीडिंग म्हणजे काय? हे जाणून घेऊ या.


स्मार्ट टॉक

क्लाउड सीडिंग ही कृत्रिम पाऊस पाडण्याची पद्धत आहे. यामध्ये सिल्व्हर आयोडाइड किंवा ड्राय बर्फ ढगांवर विमानाच्या मदतीने सोडला जातो. यामध्ये ढगांच्या प्रवाहाने लहान कण शिंपडले जातात. हे कण हवेतील आर्द्रता शोषून घेतात आणि नंतर घनरूप होऊन त्याचे वस्तुमान वाढवतात. यानंतर ढगांमधून दाट पावसाचे थेंब तयार होतात आणि पाऊस सुरू होतो. मित्रांनो, प्रथम फेब्रुवारी १९४७ मध्ये ऑस्ट्रेलियातील बाथर्स्ट येथील जनरल इलेक्ट्रिक लॅबमध्ये क्लाउड सीडिंगला सुरुवात झाली. त्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. भारतात १९५२ मध्ये पहिल्यांदा याची चाचणी घेण्यात आली होती. तर, तामिळनाडूमध्ये १९८४ मध्ये प्रथमच त्याचा वापर करण्यात आला.

# धम्माल गेमिंग ॲप्स

ॲप वर्ल्ड

छोट्यांनो, तुम्हाला मोबाईलवर गेम्स खेळायला आवडतात ना? मग ही काही गेमिंग ॲप्स तुम्हाला नक्कीच आवडतील.



✻ 'रॉयल रिव्हॉल्ट २ टॉवर डिफेन्स' हे ॲप गुगल प्ले स्टोअरमधून डाऊनलोड करून घेता येईल. या गेममध्ये वेगवेगळे राउंड्स आहेत. प्रत्येक राउंड ठराविक वेळेत पूर्ण करावा लागतो. त्यात तुमची सेना असते. प्रत्येक राउंडमध्ये सेनेतील सदस्यांची वाढ होत जाते.

✻ 'ऑलिम्पस रायझिंग'मध्ये तुम्हाला दुसऱ्यांचे किल्ले जिंकायचे आहेत. शिवाय स्वत:च्या किल्ल्यांचा बचाव करायचा आहे. या प्रवासात तुम्हाला निरनिराळे हिरो आणि देवदूत भेटतात. या कामात ते तुमची मदत करतात. हा थ्रीडी गेम आहे.

✻ 'बॉंबस्क्वॉड' हा गेम 'बॉंबरमॅन'चं अपडेटेड थ्रीडी व्हर्जन आहे. हा गेम एकापेक्षा जास्त युजर्स खेळू शकतात. गेम साधा सरळ पण मजेशीर आहे. इंटरनेटशिवायही तो खेळता येईल.

✻ 'सी बॅटल २' या गेममध्ये मल्टीप्लेअरचा पर्याय मिळतो. यातही दोन पर्याय दिले आहेत. कनेक्शन ओव्हर ब्लू टूथ आणि पास बाय पास असे हे पर्याय आहेत. हा गेम खेळतानाही तुम्हाला खूप मजा येईल.

# प्रकाशनाचं आव्हानात्मक क्षेत्र

कोण होणार?



वाचन आणि पुस्तकांची आवड असेल तर करीअरच्या दृष्टीने तुम्ही प्रकाशन क्षेत्राची निवड करू शकता. पुस्तकांचं प्रकाशन, वितरण, मासिकांचं प्रकाशन यांसारखी बरीच कामं या क्षेत्रात केली जातात. आता डिजिटल माध्यमांमध्येही पुस्तकं उपलब्ध आहेत. या क्षेत्रात लेखक, इल्युस्ट्रेटर्स, प्रूफ रिडर्स, कॉपी एडिटर्स, टाईप सेटर्स, प्रिंटर्स, बाइंडर्स, डिस्ट्रिब्युटर्स आणि मार्केटिंगसाठी चांगल्या संधी उपलब्ध आहेत.

या क्षेत्रात येण्यासाठी सुरूवातीला कोणत्याही प्रकाशन संस्थेत इंटर्नशीप करता येईल. यानंतर एडिटोरियल असिस्टंट म्हणून काम करू शकता. यानंतर डेव्हलपमेंट एडिटर आणि प्रोजेक्ट मॅनेजर अशी पदं असतात. व्यवस्थापनाशी संबंधित पदंही तुम्ही भूषवू शकता. या क्षेत्रात येण्यासाठी कोणत्याही विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण असणं आवश्यक असतं. पण भाषेतल्या पदवीधरांना जास्त संधी दिल्या जातात. पुरेशा अनुभवानंतर तुम्ही स्वत:चा प्रकाशन व्यवसाय सुरू करू शकता.

# फोन हँग होतोय?

स्मार्ट टिप्स

स्मार्टफोन हँग व्हायला लागला किंवा स्लो झाला की खूप वैताग येतो. काही वेळा नव्या फोनमध्येही ही समस्या येऊ शकते. पण फोनच्या सेटिंगमध्ये काही बदल केले तर जुना फोनसुद्धा नव्यासारखा काम करू शकतो.

✻ बऱ्याच ॲप्सचे लाईट व्हर्जन्स उपलब्ध आहेत. फेसबुकने फेसबुक तसंच मेसेंजरचे लाईट व्हर्जन्स आणले आहेत. गुगलने यू ट्यूब गो, मॅप्स गो, जीमेल गो यासारखे लाईट ॲप्स सादर केले आहेत. ते स्मार्टफोनमधला डाटा आणि बॅटरी कमी प्रमाणात वापरतात. फोनमधील रॅम आणि मेमरी कमी असेल तर अशी लाईट व्हर्जन ॲप्स डाऊनलोड करून घ्या.



✻ गरज नसेल तर लोकेशन फीचर बंद ठेवा. हे फीचर सुरु असेल तर मोबाईल सतत लोकेशन अपडेट करत राहतो. यामुळे रॅम आणि बॅटरी खर्च होण्याचं प्रमाण वाढतं आणि फोन स्लो होतो.

✻ वापर नसणारी ॲप्स डिलिट करून टाका. इतर ॲप्स वेळोवेळी अपडेट करत रहा. ॲप्स सतत अपडेट मागत असतात. या अपडेट्समुळे फोन नव्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेत असतो. जुन्या फीचर्समुळे फोन स्लो होण्याचा धोका वाढतो.

✻ फोनमध्ये एकापेक्षा जास्त अँटीव्हायरस ॲप्स डाऊनलोड करू नका. यामुळे बॅटरीचा जास्त वापर होतो तसंच फोन स्लो होतो.

✻ फोनमधला ऑटो ब्राईटनेसचा ऑप्शन डिसेबल करा. ऑटो ब्राईटनेसमुळे फोनचा ब्राईटनेस आपोआप कमी-जास्त होत राहतो. यामुळे बॅटरीचा वापर वाढतो आणि फोनही स्लो होतो.

यासारखे काही बदल केले तर तुमचा फोन अधिक चांगल्याप्रकारे काम करू शकतो.




# कशी घालवायची स्टेजची भीती?

मित्रांनो, सुट्टीत नाटक बसवताय? पण तुम्हाला स्टेजची भीती वाटते का? वर्गासमोर उभं राहून बोलायला सांगितलं किंवा गॅदरिंगमध्ये नाचगाणं सादर करायला सांगितलं तर तुम्ही बावरून जाता का? हातपाय थरथरतात का? लोकं हसतील असं वाटतं का? मग हे सगळं टाळता येईल. कसं ते पाहा.

✻ कार्यक्रमाची पूर्वतयारी करा. तुम्हाला एखाद्या विषयावर बोलायचं असेल तर आधी मुद्दे लिहून काढा. पाठ करा. आरशासमोर उभं राहून किंवा घरच्यांसमोर बोला. नाच असेल तर भरपूर सराव करा. मुख्य कार्यक्रमाआधी घरात नाच करा. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल.

फियर फॅक्टर

✻ आपलं काहीतरी चुकेल असा विचार करण्यापेक्षा सगळं छान होणार आहे असा विचार करा. सकारात्मक गोष्टी मनात आणा. अजिबात घाबरू नका.



✻ गाण्याची किंवा नृत्य स्पर्धा असेल तर तुमचा नंबर यायला जरा वेळ लागतो. या वेळेचा सदुपयोग करता येईल. रिलॅक्स होण्यासाठी गाणी ऐकता येतील. श्वसनाचे व्यायाम करता येतील. योगा करता येईल. यामुळे तुम्हाला बरं वाटेल.

✻ कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी फार ताण घेऊ नका. शांत झोप घ्या. सरावामुळे तुम्ही बरेच दमलेले असू शकता. उद्या काय होईल याचा फार विचार करू नका. स्वत:च्या क्षमतांवर विश्वास ठेवा. हेल्दी पदार्थ खा. घरच्यांचा सल्ला घ्या. सगळ्यांबरोबर मस्त वेळ घालवा. यामुळे तुम्हाला बरं वाटेल.

ठिपके जुळवा



## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) खग्रास सूर्यग्रहणादरम्यान सूर्याचा डोळ्यांना दिसणारा भाग कोणता?
२) ब्रेडसाठी वापरलं जाणारं यिस्ट काय आहे?
३) पिण्याचं पाणी शुद्ध करण्यासाठी कोणत्या वायूचा वापर होतो?
४) पांडा हा प्राणी कोणाच्या कुटुंबातला सदस्य आहे?
५) पृथ्वीवरचा सर्वात कठीण पदार्थ कोणता?
६) जागतिक तापमान वाढीला कोणता वायू जबाबदार ठरतो?
७) पालकाची पानं कशाचा मुख्य स्रोत आहेत?
८) सर्वाधिक नैसर्गिक उपग्रह असणारा ग्रह कोणता?
९) भारतीय संघ पहिली क्रिकेट कसोटी कोणत्या वर्षी खेळला?
१०) लसणाला विशिष्ट प्रकारचा उग्र वास कशामुळे येतो?

उत्तरं : १) प्रभामंडळ(कोरोना) २) फंगस ३) क्लोरीन ४) अस्वल ५) हिरा ६) कार्बनडायऑक्साईड ७) लोह ८) शनी ९) १९३२ १०) सल्फरसंयुगे

# लक्ष केंद्रित करण्यासाठी...

स्टडी टिप्स

अभ्यास किंवा दुसरं कोणतंही काम करताना आपलं सगळं लक्ष त्याकडे केंद्रित होणं गरजेचं असतं. पण अनेक कारणांमुळे लक्ष उडू शकतं. कधी आपल्याला टीव्ही बघावासा वाटतो तर कधी मैदानात खेळणारे सवंगडी खुणावत असतात. मध्येच कधीतरी मोबाईलमध्ये डोकावून बघावंसं वाटतं. या सगळ्याचा परिणाम अभ्यासावर आणि परीक्षेतल्या गुणांवर होत असतो. हे टाळण्यासाठी लक्ष केंद्रित करण्याच्या काही वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करायला हवा.

✻ आजूबाजूला खूप आवाज असेल तर शरीरात कोर्टिसोल नावाचं हार्मोन तयार होतं. या हार्मोनमुळे लक्ष विचलित होतं. त्यामुळे अभ्यासासाठी शांत जागेची निवड करा. घरात अभ्यास करणं शक्य नसेल तर लायब्ररी किंवा बागेचा पर्याय तुम्ही निवडू शकता.

✻ एकाग्रतेसाठी वेगवेगळे व्यायाम करता येतील. कोडी सोडवणं, वाचन, मेडिटेशन करून तुम्ही मेंदूला पुरेसं खाद्य पुरवाल. यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करणं सोपं जाईल.



✻ दिवसभर मोबाईल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनसमोर बसून राहिल्याने डोळ्यांना त्रास होतो. शिवाय लक्षही केंद्रित करता येत नाही. यासाठी तुम्ही २०:२०:२० चा नियम पाळू शकता. दर २० मिनिटांनी २० फूट अंतरावरच्या वस्तूकडे २० सेकंदासाठी पाहणं हा व्यायाम तुम्ही करू शकता. यामुळे डोळ्यांना आराम मिळेल. तसंच लक्ष केंद्रित करणं सोपं होईल.

✻ काही काळ ऑफलाईन रहा. फोन, इंटरनेट सगळं काही बाजूला ठेवा. इंटरनेट सर्फिंग करू नका. सोशल मीडियापासूनही लांब रहा. यामुळे अभ्यासावर लक्ष केंद्रित करणं सोपं जाईल.

दोस्त हे मस्त


## न उडू शकणारे काकापो

काकापोची गणना अत्यंत दुर्मीळ प्रजातींमध्ये केली जाते. आजमितीस फक्त १२५ काकापो उरले आहेत. या पक्ष्याला न्यूझीलंडचा आउल पॅरट असं म्हटलं जातं. हे पक्षी उडू शकत नाहीत. प्रौढ काकापोचं वजन ९ पाऊंडांपर्यंत असतं.



खादाडी

## यम्मी चोको चिप्स मफीन्स




आज चॉकलेट चिप मफिन्स कसे बनवायचे ते पाहू या. यासाठी दोन कप मैदा, एक कप पीठी साखर, ६० ग्रॅम बटर, पाऊण कप दूध, एक अंडं, एक टेबलस्पून व्हॅनिला इसेन्स, पाऊण कप चोको चिप असं साहित्य घ्या. ओव्हन २०० अंश सेल्सियसला प्री हीट करून घ्या. १२ मफिन्सचा स्टँड घ्या. त्याला बटर किंवा तेल लावा. आता एका मोठ्या भांड्यात मैदा घाला. त्यात साखर घालून मिक्स करून घ्या. बटर वितळवून घ्या. अंडं आणि दूध एकत्र करा. नीट मिसळून घ्या. आता मैदा आणि साखरेच्या मिश्रणात बटर, दूध आणि अंड्याचं मिश्रण व व्हॅनिला इसेन्स घाला. चोको चिप्स घालून मिसळून घ्या. आता हे मिश्रण मफिन्सच्या ट्रेमध्ये घाला. २० मिनिटांसाठी बेक करा. थंड होऊ द्या. मस्त मफीन्स तयार...

लाईफस्टाईल

## आरोग्यदायी जंकफूड!

जंक फूड खाल्ल्यामुळे वजन वाढतं. हे अन्न आरोग्यासाठी हानिकारक असतं असं म्हटलं जातं. पण काही प्रकारचं जंक फूड आरोग्याच्या दृष्टीने चांगलं असतं. उदाहरणार्थ, डार्क चॉकलेटमध्ये बरेच पोषक घटक असतात. त्यात अँटी ऑक्सिडंट्स असतात. क्रीममध्ये बरीच खनिजं असतात. पॉपकॉर्न आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात. आईस्क्रीमही आरोग्याच्या दृष्टीनं चांगलं ठरू शकतं. अर्थात ते खूप खायचं नसतं. आईस्क्रीममध्ये कॅल्शियमचं पर्याप्त प्रमाण असतं.



योगा टाईम

## उपयुक्त फ्लेमिंगो आसन

छोट्यांनो, तुम्ही फ्लेमिंगोसारखं आसन करू शकता. यासाठी दोन्ही पाय जुळवून उभे रहा. आता हात पंखांप्रमाणे पसरवा. पुढच्या बाजूला वाका आणि एक पाय वर घेऊन मागच्या बाजूला न्या. हा पाय खाली आणा मग दुसरा पाय वर न्या. यामुळे तुम्ही तोल साधू शकता.



# कलासक्त



# विजय चव्हाण
## एक दिलखुलास अभिनेता

**आपल्या प्रसन्न व दिलखुलास व्यक्तिमत्त्वास विनोदी पद्धतीने व्यक्त करणारा अभिनेता विजय चव्हाण होता. अनेक मराठी नाटकांतून सिनेमांतून व दूरदर्शन मालिकेतून त्याने विनोदी व चरित्र भूमिका केल्या. चार दशकांहून अधिक काळ त्याने विविधरंगी भूमिका केल्या. तो एक चतुरस्त्र अभिनेता होता.**

शरद कोरडे

विजय चव्हाणचा जन्म मुंबईत २ मे १९५५ साली झाला. भारतमाता चित्रपटगृहाच्या मागील हाजी कासम चाळीत त्याचे बालपण गेले. दादरच्या इंग्लिश स्कूलमध्ये शालेय शिक्षण झाल्यावर त्याने रूपारेल कॉलेजमधून बी.ए.ची पदवी घेतली. कॉलेजच्या एकांकिकांमध्ये त्याने भाग घेतला. विजय चव्हाण व विजय कदम यांनी एकत्र येऊन 'रंगतरंग' ही नाट्यसंस्था सुरू केली. त्यानंतर त्याची लक्ष्मीकांत बेर्डे यांच्याशी ओळख झाली. दोघांनीही अनेक एकांकिकांमध्ये कामे केली व त्यांची मैत्री घट्ट झाली. त्यावेळी पुरूषोत्तम बेर्डे 'टूरटूर' नाटकाची निर्मिती करत होते. त्यावेळी लक्ष्मीकांतने विजय चव्हाण याला बोलावून घेतले व त्याची पुरूषोत्तम बेर्डे यांच्याशी ओळख करून दिली. विजय चव्हाणला बेर्डेंनी या नाटकात प्रवेश दिला. लक्ष्मीकांत बेर्डे, विजय कदम, सुधीर जोशी, दिपक शिर्के आदी कलाकार या नाटकात होते. कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक यांची एक सहल निघते. मग पुढे बसचा ड्रायव्हर, कंडक्टर यांच्यासह पुढे एक एक माणूस या सहलीत सामील होतो व या सगळ्या विनोदी कलाकारांनी एकत्र येऊन जी धमाल केली त्याची खुमासदार कहाणी पुरूषोत्तम बेर्डे यांनी लिहिली होती. हे नाटक तुफान चालले. या नाटकाचे परदेशातही प्रयोग झाले. विजय चव्हाणचे हे पहिले व्यावसायिक नाटक. या नाटकानंतर त्याला 'द्रयवदन' हे नाटक मिळाले. या नाटकाचेही भारतभर प्रयोग झाले. काही प्रयोग अमेरिकेतही झाले. हे नाटक पाहून 'सुयोग' नाट्यसंस्थेचे सुधीर भट यांनी विजय चव्हाणला 'मोरूची मावशी' साठी आमंत्रित केले. विजय त्यावेळी मफतलाल कंपनीमध्ये नोकरी करीत होता. नोकरी सांभाळून तो या नाटकाचे प्रयोग करीत होता. 'मोरूची मावशी' हे आचार्य अत्र्यांचे नाटक. लंडनला शिकत असताना त्यांनी ब्रंडन 'टॉमस यांचे चार्लीज आंट' हे नाटक पहिले तेव्हापासून अत्रेंच्या मनात या नाटकावर एक मराठी नाटक लिहिण्याचे त्यांनी ठरविले. इ.स. १८९२ साली हे नाटक प्रथम इंग्लिश रंगभूमीवर आले होते व त्याने प्रचंड लोकप्रियता मिळविली होती. या नाटकाने जागतिक रंगभूमीवरील सारे रेकॉर्ड तोडले होते. अत्रे यांनी या नाटकावर आधारीत मराठी नाटक त्यांच्या शैलीने लिहिले व अत्रे थिएटर्स तर्फे हे नाटक रंगभूमीवर आले. त्यावेळी या नाटकात राजन जावळे, बापूराव माने, दामूअण्णा मालवणकर, दुर्गा खोटे व कर्नलच्या भूमिकेत स्वतः आचार्य अत्रे यांनी काम केले होते. या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईच्या बिर्ला मातोश्री नाट्यगृहात १ मे १९६३ या दिवशी झाला. सुधीर भटांच्या 'सुयोग' तर्फे या नाटकाचा पुन्हा प्रयोग १ जानेवारी १९८५ मध्ये मुंबईत केला. त्यावेळी या नाटकात विजय चव्हाण, प्रदीप पटवर्धन, प्रशांत दामले, सुरेश टकले, विजय साळवी असे तगडे कलाकार होते. या नाटकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात गाणी घातली होती व त्याला संगीत अशोक पत्की यांनी दिले होते. त्यातले विजय चव्हाण (मावशी) याला दिलेले मुख्य गाणे 'टांगटिंग टिंगा' हे नाटक तुफान रंगत असे व प्रेक्षकांनी त्याला भरभरून दाद दिली. पुढे विजय चव्हाण याने तू 'सुखकर्ता', 'झिलग्यांची खोली', 'सगळे सभ्यपुरूष', 'सासरेबुवा जरा जपून' 'भागम्भाग', 'देखणी बायको दुसऱ्याची', 'आती क्या खंडाळा', 'श्रीमंत दामोदरपंत', 'लहानपण देगा देवा' आदी नाटकांतून कामे केली.

विजय चव्हाणने पहिला चित्रपट प्रवेश केला तो १९८५ सालच्या 'वहिनीची माया', या चित्रपटांतून या चित्रपटात रमेश भाटकर, रविंद्र बेर्डे हे कलाकार होते. त्यानंतर त्याने 'घोळात घोळ', 'धुमाकूळ', 'बलिदान', 'शेम टू शेम', 'माहेरची साडी' अशा वेगवेगळ्या प्रकारच्या भूमिका केल्या. महेश कोठारेंचा तो आवडता कलाकार होता. त्यांच्या 'झपाटलेला', 'माझा छकुला', 'चिमणी पाखरं', 'पछाडलेला' आदी चित्रपटात त्याने कामे केली व रसिकांना ही मनापासून आवडली. इ.स. २००६ चा 'शुभमंगल सावधान' या चित्रपटांत त्याने नायकाच्या बापाचे वेगळ्या अभिनय शैलीने काम केले व त्याने आपण विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे करू शकतो हे दाखवून दिले. त्यानंतर त्याने महेश कोठारे यांच्या 'जबरदस्त' व 'दुभंग' या चित्रपटातूनही वैविध्यपूर्ण कामे केली. 'गोल गोल डब्यात', 'हलाल', 'वन रूम किचन' आदी चित्रपटांतून कामे केली. विजय चव्हाणचे नाटक व चित्रपट मिळून ३५० कलाकृतींमध्ये कामे केली. त्याने दूरचित्रवाहिनीवरील 'असे पाहुणे येती', 'माहेरची साडी', 'येऊ का घरात', 'रानफुल' व 'लाईफ मेंबर' आदी मालिकांमधूनही कामे केली.

महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेच्या वेळी रवींद्र नाट्यगृहात माझा विजयशी परिचय १९८४ मध्ये झाला. त्यानंतर अनेकदा 'मोरूची मावशी' नाटक मी पाहिले व स्नेह वाढला. माझे मित्र नरेंद्रकुमार जोशी निर्मित 'अपराधी' या चित्रपटात विजयला सहाय्यक भूमिकेत घेण्यात आले. दिग्दर्शक होते अरूण कर्नाटकी. या चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या वेळी आमची मैत्री झाली. 'अपराधी' या सिनेमाचे एक शेड्युल थळ-चाळमळा येथील कोळीवाड्यात झाले. समुद्रात गलबतात एक गाणेही चित्रीत करण्यात आले. विजय चव्हाण व प्रिया बेर्डेची जोडी होती. सोबत जनार्दन परब व सुनिता गोरे, दिपक शिर्के आदी कलाकार होते. त्यानंतर नरेंद्रकुमार यांच्या 'संकल्प' या चित्रपटात एका महत्त्वाच्या भूमिकेत विजय होता. सोबत अंकुश चौधरी नायक व संयोगिता नायिका होती. कुलदीप पवार, सतीश पुळेकर, रवि पटवर्धन व विक्रम गोखले हे कलाकार होते. या दोन्ही चित्रपटातून अरूण कर्नाटकी यांच्यासोबत सहाय्यक दिग्दर्शन करण्याची संधी मात्र मिळाली. 'संकल्प' चित्रपटातील गाणी खुप गाजली. जगदीश खेबुडकर यांच्या गीतांना ऋषीराज यांनी संगीत दिले होते. चित्रीकरणाचे वेळी विजय खूप धमाल करून सर्वांना हसवायला. सतीश पुळेकर खूप अबोल आहेत. एरोल स्टुडिओतील चित्रीकरणाचे वेळी विजयने खूप गंमती करून खुप हसविले, जाताना पुळेकरांनी त्याला सांगितले. 'अरे किती महिन्यानंतर मी इतका हसलो आहे. थँक्स विजय' असा हा सर्वांना जीवनात आनंद निर्माण करणारा, मोकळ्या मनाचा दिलखुलास माणूस होता. अलिबागमधील 'आंबराई' हे त्याचे आवडते रिसॉर्ट होते. अनेकदा तो कुटूंबासह येथे येऊन रहायचा. त्यांची पत्नी आसावरी जोशी याही 'मोरूच्या मावशी' मध्ये सहाय्यक भूमिकेत होत्या. या नाटकानेच या दोघांना विवाहाच्या बंधनात बांधले. विजय यांचा मुलगा वरद हा चित्रपट व दूरदर्शन मालिकेत काम करतो. विजय चव्हाणला संस्कृती कलादर्पणचा जीवन गौरव पुरस्कार २०१७ ला मिळाला. 'अशी असावी सासू' या चित्रपटासाठी शासनाचा स्क्रिन पुरस्कार मिळाला.

विजय चव्हाण यांचा मुलुंडच्या फोर्टीस हॉस्पिटलमध्ये फुफ्फुसाच्या आजाराने २४ ऑगस्ट २०१८ ला दुर्दैवी मृत्यू झाला. त्याच्या आठवणी रसिकांच्या हृदयात सदैव राहतील. ●●




# 'जुनं फर्निचर'चा ट्रेलर

भाग्यश्री रसाळ

मराठी सिनेइंडस्ट्रीत सध्या वेगवेगळ्या विषयांवरचे सिनेमे येत आहेत. त्यातच आता 'जुनं फर्निचर' या सिनेमाची भर पडली आहे. चित्रपटाच्या नावानं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं आहे.

गेल्या बऱ्याच दिवसांपासून जुनं फर्निचर या सिनेमाची चर्चा सुरू आहे. नुकताच या सिनेमाचा ट्रेलरही प्रदर्शित झाला. काय अपेक्षा आहेत आमच्या अशा त्यांच्याकडून... दिवसातून एकदा आमच्या खांद्यावरून हात फिरवून विचार ना.. आई कशी आहेस? बाबा कसे आहात? मन सुन्न करणारे हे वाक्य नकळत डोळ्यांच्या कडा पाणावणारे आहे. आपल्याकडे अनेकदा वयस्कर व्यक्तींना आऊटडेटेड, अडगळीतले सामान असे म्हटले जाते. परंतु याच सामानाची किंमत आणि ताकद काय आहे, हे सांगणारा चित्रपट लवकरच प्रदर्शित होत आहे.


महेश वामन मांजरेकर दिग्दर्शित 'जुनं फर्निचर' या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा नुकताच दिमाखात पार पडला. या सोहळ्याला अधिक रंगात आणण्यासाठी वैभव जोशी यांच्या 'सोबतीचा करार' या संगीत मैफलीचेही आयोजन यावेळी करण्यात आले. यात स्वप्नील बांदोडकर, केतकी माटेगावकर, पवनदीप राजन यांचाही सहभाग होता. यावेळी महेश मांजरेकर यांनी 'काय चुकले सांग ना?' या मनाला स्पर्शून जाणाऱ्या गाण्याच्या काही ओळी गायल्या. ●●



# नाना पाटेकर
## एक वादळी व्यक्तिमत्व'

**जेव्हा कधी तुफान आणि वादळ एकाच वेळी येते तेव्हा त्या झंझावातात कशाचाही टिकाव लागत नाही. नाना पाटेकर हे एक असेच वादळी व्यक्तिमत्व आहे. आपल्या अभिनय क्षेत्रात आणि आयुष्यातही. तुम्ही वेस्टइंडीजचा महान फलंदाज विवियन रिचर्ड्सची तुफान फलंदाजीची बघितली असेल. जगातला कोणताही महान गोलंदाज असला तरीही विवियन रिचर्ड्स त्याची तमा बाळगायचा नाही. अगदी पहिल्या बॉल पासुन तो गोलंदाजांवर तुटून पडायचा. झंझावात होता विवियन त्याच्यासमोर भले भले गोलंदाज हात टेकायचे. तो खेळायला लागला की भल्या भल्या गोलंदाजाना धडकी भरायची. क्रिकेटमधील त्याची कारकीर्द वादळी राहिली.**





श्रीराम शेटये

नाना पाटेकर यांचा अभिनय विवियन रिचर्ड्सच्या फलंदाजी सारखाचा झंझावात असतो. कशाचीही तमा न बाळगता आपला नैसर्गीक अभिजात अभिनय नाना पाटेकर करतात.

''जब दो शेर लढते है तो कुत्ते दुर से भौकते है '' हा डायलॉग सागर संगम चित्रपटातील आहे. समोर शत्रुघ्न सिन्हा आणि मिथून यांची फायटींग सुरू असते. असेच अनेक आक्रमक डायलॉग्स तिरंगामध्ये राजकुमारसारख्या दिग्गज अभिनेत्यासोबत किंवा क्रांतिवीरमध्ये डैनी डेन्जोपा सोबत आहेत. नाना पाटेकर यांचे खरे नाव विश्वनाथ पाटेकर. अगदी लहान वयात वयाच्या तेराव्या वर्षापासून नाना पाटेकर यांच्यावर अत्यंत वाईट प्रसंग आला. नाना पाटेकर यांच्या वडीलांचा टेक्सटाईल प्रिंटीगचा स्वतःचा व्यवसाय होता. परंतु, जवळच्या नातेवाईकांने नानाच्या वडीलांची फसवणूक केली आणि सर्व संपत्ती हडप केली. नानाच्या वडीलांना घर-दार विकून रस्त्यावर यावे लागले. लहान वयात नानाला पोटासाठी काम करावे लागले. नानाला नाटकाची आवड होतीच. जे. जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकत असताना अनेक नाटकात काम केले होते. परंतु उषा मेहतांच्या ' गमन' या नाटकात त्यांनी केलेली भूमिका खुप गाजली. उषा मेहतांच्या परिसस्पर्शाने या इंडस्ट्रीत अनेक हिरे चमकले नानादेखील त्यातलेच एक. नाना पाटेकर यांना हिंदी चित्रपटात जाण्यासाठी स्मिता पाटील यांनीच प्रथम प्रयत्न केले. स्मिता पाटील यांनी नानांना 'आज की आवाज' या चित्रपटात काम मिळवून दिले.

खरे तर भारतात सिनेसृष्टीला दादासाहेबं फाळके नावाच्या मराठी माणसाने जन्माला घातले. मास्टर विनायकसारखे महान मराठी कलाकार या इंडस्ट्रीत होते. ज्यांचा अभिनय आणि रूबाबदार पणा पाहून हिंदी चित्रपटातल्या आघाडीच्या अभिनेत्यांना त्यांचा हेवा वाटायचा. ही इंडस्ट्री सुरूवातीला मराठी माणसांची असूनही पैशाच्या जोरावर परप्रांतीय भांडवलदारांनी तिच्यावर कब्जा मिळवला. मग महाराष्ट्रातील अनेक महान कलावंताना या भांडवलदारांवर अवलंबून रहावे लागले. लता मंगेशकर, सुलोचना दीदी, रमेश देव, आशा भोसले, कानन कौशल, सारख्या अनेक कलाकारांना या भांडवलदारांवर अवलंबून रहावे लागले. लता दीदी आणि जयश्री गडकर यांच्यासारखे काही सन्माननीय अपवाद वगळता इतर कलाकारांना या भांडवलदारांनी नेहमीच दुय्यम लेखले. हिंदी चित्रपट निर्माते मराठी कलाकारांना नेहमीच दुय्यम भूमिका देत असत. निर्मात्यांचा रूबाब संभाळून मिळेल ते काम करायचे अशी मराठी कलाकारांची परिस्थिती होती.

मराठी चित्रपट सृष्टीत सुपरस्टार असलेल्या अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे सारख्या कलाकारांना हिंदी चित्रपटात नोकरा चाकराच्या भूमिका कराव्या लागत. मराठी प्रेक्षकांना याचे दुःख वाटे.

परंतु, ज्या दिवशी नाना पाटेकर या इंडस्ट्रीत आले तेव्हा त्यांनी या हिंदी निर्मात्यांचा माज चांगलाच उतरवला. सुरवातीच्याच भूमिकेसाठी निर्मात्याला खडासावले व तडक बाहेर पडले.सुप्रसिद्ध अभिनेत्री स्मिता पाटील यांनी 'आज की आवाज' या चित्रपटासाठी विधू विनोद चोप्रा यांच्याकडे नाना पाटेकर यांना नेले होते. परंतु बलात्कार करणाऱ्याची भूमिका होती. नानांना ती आवडली नाही. चोप्रांना खडे बोल सुनावून नाना बाहेर आले. परंतु, नंतर स्मिता पाटील यांनी समजावले व मध्यस्थी केली त्यानंतर त्यांनी या चित्रपटात काम केले. हा चित्रपट चालला आणि नाना पाटेकर यांनी मागे वळून पाहिले नाही. अंकुश (१९८६), सागर संगम (१९८६) प्रतिघात (१९८७),परिंदा (१९८९), प्रहार (१९९१), तिरंगा (१९९३), क्रांतिवीर (१९९४) हे त्यांचे काही प्रमुख चित्रपट आहेत. आपल्या संवाद आणि अभिनयासाठी नाना पाटेकर प्रसिध्द आहेत. समोर कोण उभा आहे याची नाना पाटेकर फिकिर करीत नाहीत. आपला नैसर्गिक अभिनय ते करतात. त्यांचे नैसर्गिक वादळी संवाद आणि तितकाच आक्रमक अभिनय याने प्रेक्षक भारावून जातात. क्रांतिवीरमधला त्यांचा आक्रमक अभिनय आणि वेगवान अप्रतिम संवाद यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांनी अक्षरक्षः डोक्यावर घेतला.क्रांतिवीरमध्ये समोर डैनीसारखा दिग्गज अभिनेता होता. ज्याच्या अभिनयाचा अमरीश पुरी, शक्तीकपूर, अमजद खान यांनाही हेवा वाटतो असा अभिनेता होता. तरीही नानाचे संवाद आणि अत्यंत आक्रमक अभिनय याला तोड नाही. तिरंगामध्ये समोर राजकुमार होता हे दोन्ही चित्रपट हिट झाले. नाना पाटेकर यांचा फिल्म इंडस्ट्रीत एक दरारा होता. एखादी भूमिका नानाला पटली नाही तर नाना करणार नाहीत. स्पष्ट नकार देत असत. मराठी कलाकारांना कोणी कमी लेखत असेल तर नाना त्याचा चांगलाच समाचार घेत असत.

नाना पाटेकर यांनी नाम फाउंडेशन नावाची एक सामाजिक संस्था स्थापना केली आहे. या संस्थेमार्फत नाना पाटेकर आत्महत्या केलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करतात. बिहारमधील पुरग्रस्त लोकांनाही नाम फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी मदत केली. एक माणूस म्हणून नाना पाटेकर जितके आक्रमक तितकेच विशाल हृदयाचे आहेत. आपले विचार अंत्यत परखडपणे आणि स्पष्ट मांडताना ते कशाचीही तमा बाळगात नाहीत. गरीब पीडित आणि शेतकरी यांच्या हितासाठी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून ते सामाजिक कार्य करीत आहेत. आपल्या मिळकतीचा बराचसा हिस्सा ते समाज कार्यासाठी खर्च करीत आहेत. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ. चित्रलेखा पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग- email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)